# हाकारा

वर्ष तिसरे अंक दुसरा
एप्रिल–जून १९८२



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद


## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | गं. बा. सरदार |
| **उपाध्यक्ष** | अनंतराव बोधनकर |
| | काळूराम दोधाडे |
| **चिटणीस** | रा. के. मुटाटकर |
| **सहचिटणीस** | जगदीश गोडबोले |
| | विजय भानू |
| **खजीनदार** | अनिल गोरे |
| **सभासद** | गोविंद गारे |
| | श. गो. देवगावकर |
| | नान्सी गायकवाड |
| | जनार्दन वळवी |
| | शरद कुलकर्णी |
| | थियो रेमिडियोस |


## सल्लागार मंडळ

| | |
|---|---|
| बाबा आढाव | जयंत पाटील |
| बाबा आमटे | विजय परुळकर |
| रावसाहेब कसबे | अनुताई वाघ |
| सुधा काळदाते | विलास संगवे |
| विजय तेंडुलकर | वाहरु सोनवणे |
| वि. म. दांडेकर | गीता साने |
| मधुकर देवल | छाया सुरतवंती |
| चित्रा नाईक | दत्ता सावळे |

आ. ना. नारळकर

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।

# हाकारा



( महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक )

## अनुक्रमणिका


'एकजाती' वृक्ष–लागवडीची दुसरी बाजू
**अ. रा. बापट** ३

धरणे आणि विकास
**विजय परांजपे** ८

कविता : **द. सु. राजगडकर**
**मा. तु. खैरकर**
**संजय टेकाम**
**सीताराम पवार** १६

जंगलातले दहा दिवस
**पुरुषोत्तम शेठ** १९

अरण्येर अधिकार
**प्रभा तुळपुळे** २१

माडियांच्या विवाहप्रसंगातील कलात्मक मुंडी
**गोविंद लांबे** २५

म्हणींमधून दिसणारे गोंडी लोकजीवन
**भुजंग मेश्राम** २७

वननीति आणि वन–संवर्धन कृतिसत्र

संवाद

'गोबर गॅस'
**शिवाजीराव जामदार** ३८

'वनौषधी' शिबिराचा वृत्तांत ३९


---


वर्ष तिसरे : अंक दुसरा
**एप्रिल–जून १९८२**
परिषद / हाकारा संयुक्त
वार्षिक वर्गणी : २० रुपये
**एका अंकाची किंमत : ४ रुपये**
पत्रव्यवहाराचा पत्ता :
महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद / हाकारा
द्वारा : जगदीश गोडबोले
सीमा, ब ७, शिरोळे मार्ग,
पुणे ४११ ००४.

**कार्यकारी संपादक**
जगदीश गोडबोले

**संपादक मंडळ**
रामचंद्र मुटाटकर
शरद कुलकर्णी

**प्रकाशक :**
प्रा. रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यासाठी
साप्ताहिक मुद्रण,
१०२५ सदाशिव पेठ,
पुणे ३०,
येथे छापून प्रसिद्ध केले.

## संपादकीय

'**हा**कारा'च्या गेल्या अंकात डॉ. अरुण लिमयेचा 'अमेरिकेतील रेड-इंडियन्स' हा लेख प्रसिद्ध झाला आहे. वास्तविकत: दीड-दोन वर्षांपूर्वीच त्याने हा लेख दिला होता. अंकाच्या सुरुवातीच्या काळात लेखांची अडचण असायची. काय छापावे, अशी चिंता असायची. अशा वेळी हा मित्र ताबडतोब मदतीला आला आणि तत्परतेने त्याने आपला हा लेख दिला.

लेख मिळाल्यानंतर अनेक अंक प्रसिद्ध झाले; पण लेख काही छापला गेला नाही. प्रत्येक वेळेस भेट झाली की, तो गमतीने म्हणायचा, 'लेख पसंत नसेल तर परत कर, पसंत असेल तर लौकर तरी छाप, आमची 'एडिशन' कधी संपेल याचा भरवसा नाही!' लेख उत्तम होता, न छापण्याचा प्रश्नच नव्हता. तसं काही कारणही नव्हतं. कदाचित असेलही. कारण लेख प्रसिद्ध झाला तेव्हा अरुण मृत्युशय्येवर होता आणि अंक त्याच्या घरी पोहोचला तेव्हा 'एडिशन' संपली होती!


तशी प्रत्येकाचीच 'एडिशन' कधी ना कधी संपणार असते. संपणे अटळ असते. अरुणच्या बाबतीत तर हे अधिकच अटळपणे दिसत होते; पण हे अटळपण पेलण्याची, त्याची जिगर जबरदस्त होती. लढतात खूप; पण लढाईचा शेवट इतका स्पष्टपणे माहीत असूनहि जिगरीने लढणारे थोडे! नश्वर देहाची आख्याने झोडून देहाला कवटाळून बसणारे बहुत आणि देहावर जिवापाड प्रेम करूनही देहाचे नश्वरपण जाणणारे अरुणसारखे थोडे!

सार्वजनिक कामामध्ये खूप कार्यकर्ते भेटतात. उत्तमोत्तम कार्यकर्ते भेटतात. त्यागी–विरागी–ज्ञानी सर्व प्रकारचे भेटतात; पण 'माणसं' भेटत नाहीत. आपल्या मताचा, ज्ञानाचा, अनुभवाचा यथार्थ अभिमान बाळगूनही त्यापलीकडे पाहू शकणारी, जाऊ शकणारी माणसं भेटत नाहीत. अरुण उत्तम कार्यकर्ता होता; पण त्याहून अशा विरळ माणसांपैकी एक होता म्हणूनच त्याच्या जाण्याचं दु:ख खूप सलत राहील!

अरुणची याद अशी माणसं घडवायला मदत करेल हीच आशा!

आणखी काय लिहिणार?

# एकजाती वृक्षलागवडीची दुसरी बाजू



**अ. रा. बापट**

वन-खाते, विशेषत: ' वन-विकास महामंडळा' द्वारे ' एक-जाती वृक्षलागवड ' (Mono-culture) मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आली आहे. निसर्ग-संतुलनाच्या दृष्टीने निसर्ग-प्रेमींनी याला जोरदार आक्षेप घेतला आहेच; शिवाय बहुतांश ठिकाणी आदिवासींच्या उपयोगाची तथाकथित ' किरकोळ ' नैसर्गिक जंगले साफ करून या ' मूल्यवान ' एक-जाती वृक्षांची लागवड केली जात असल्याने सामाजिक कार्यकर्त्यांनीही त्याला जोरदार हरकत घेतली आहे.

या संदर्भातील ' पाइनची लागवड : एक शेख महंमदी योजना ' हा या विषयावरील डॉ. अनिल गोरे यांचा लेख आम्ही अगोदर प्रसिद्ध केला आहेच. (' हाकारा ' डिसेंबर १९८१.)

या प्रश्नाच्या आर्थिक—तांत्रिक आणि सामाजिक अशा तीन बाजू आहेत. तीन्ही महत्त्वाच्या आहेत आणि एकमेकांशी निगडित आहेत. म्हणूनच या महत्त्वाच्या प्रश्नावर सर्वांगीण व समतोल चर्चा घडावी असा आमचा प्रयत्न आहे. कार्यकर्ते, वन-कर्मचारी व इतर वाचकांचा प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे — संपादक.

शेतीप्रमाणे एकजाती वृक्षांची लागवड करून, वने वाढविणे या जोपासना-प्रकारास इंग्रजीत ' मोनो-कल्चर ' म्हणतात. या वनजोपासना-प्रकाराची दुसरी बाजू मांडण्याचा हा प्रयत्न आहे. मुळात वन—विज्ञान आणि त्यातील एक जाती लागवड ( मोनोकल्चर ) या विषयाची फार थोड्यांना कल्पना आहे. म्हणून दुसरी बाजू मांडण्यापूर्वी, प्रथम पहिली बाजू थोडक्यात पाहू या.

टीकाकारांच्या मते एकजाती वृक्षलागवड या जोपासनाप्रकाराचे उद्दिष्ट केवळ व्यापारी आहे. पर्यावरण ऱ्हास किंवा नैसर्गिक मूल्यांचा ऱ्हास याकडे मोनोकल्चरचे प्रणेते दुर्लक्ष करतात. प्रजातींनी युक्त मिश्र-वनांचा ऱ्हास होत आहे. एकजाती वने जमिनी-तील एकच एक अन्नद्रव्य शोषण करतात. या सतत शोषणामुळे जमिनीची प्रतवारी घसरते. जमीन निकस बनते. एकजाती वृक्षवनांमध्ये काही विशिष्ट कीटक, बुरशी यांचा प्रादुर्भाव होण्यास पोषक वातावरण होते. त्यामुळे उत्पन्न होणारे रोग सर्वदूर वेगाने पसरतात. इतर वृक्षजातींना मारक वातावरण तयार होते. एकूण वनांचा ऱ्हास होतो. वनांची विविधता नष्ट झाल्यामुळे अशा वनांत पशु-पक्षी यांना खुल्या विहारासाठी अटकाव होतो. त्यांची वसतिस्थाने संकोच पावतात किंवा अजिबात नष्ट होतात. त्यांना विविध प्रकारचा झाड-पाला, गवत, चारा न मिळाल्याने त्यांची भरभराट, पैदास खुंटते. क्रमश: हे प्राणी दुर्मिळ, नष्ट होण्याची भीती असते. निसर्गातील अन्न, पाणी आणि वातावरण यांची चक्रं सुरळीत फिरत रहात नाहीत. निसर्गाचे संतुलन बिघडते. अशा मोनोकल्चर वनांची शोभा

विलोभनीय नसते. भोवतालचे वातावरण आल्हादकारक राहात नाही. वनांचा नैसर्गिकपणा नष्ट होऊन, त्यात साचेबद्ध, कंटाळवाणा ठरीवपणा येतो वने सृष्टिसौदर्य-मूल्यांच्या दृष्टीने निकृष्ट होतात. पर्यावरणघटक, कर्बद्विप्राणिलवायु, प्राणवायु, नत्रवायु, बाष्प आणि इतर घटकांचा साचेबद्ध उपयोग होऊन, वातावरणातील घटकांचे संतुलन बिघडत असावे. म्हणून अशा प्रकारे केवळ व्यापारी दृष्टिकोनातून होणारी वनजोपासना निसर्गाला घातक आहे. वन–विज्ञानाची फारशी माहिती पदरात नसताना सुद्धा, वनजोपासनेच्या मोनोकल्चर या पद्धतीच्या लागवडीबाबत, टीकाकारांनी अशी झोड उठविल्याचे दिसते.

## वनजोपासनेचे शास्त्र

वने म्हणजे पर्वतमय, डोंगराळ, खडकाळ, उजाड, पड–जमिनी आणि त्यावर विनासायास निसर्गत: वाढणारा झाडोरा, अशीच सर्व सामान्य समजूत आहे. अशीच चुकीची पण पक्की समजूत असणाऱ्यांना, वन–विज्ञान किंवा वनजोपासनेचे शास्त्र आहे, हे कसे बरे पटावे ? शेती, बागायत, मळे, वाड्या ही जशी प्रगत शास्त्रे आहेत त्याचप्रमाणे इमारती–लाकूड, जळाऊ लाकूड किंवा इतर गौणवनोत्पादने मिळविण्यासाठी वृक्षजाती जोपासनेचे वन–विज्ञान हे एक शास्त्र आहे. या विज्ञानाच्या शाखेपैकी वनव्यवस्था ही एक शाखा आहे. वनव्यवस्था या शाखेची तीन प्रमुख अंगे आहेत.

(१) अर्थशास्त्रीय अंग – थोडक्यात सांगावयाचे तर परिमाण, गुणवत्ता आणि मौलिकता या तीन्ही पातळींवर जास्तीत जास्त उत्पादन घेणे.

(२) व्यवस्थापनक्षेत्राचे संधारण – जमीन, पाणी व वातावरण यांचे संधारण करणे.

(३) सौंदर्य–मूल्य जोपासना – क्षेत्रातील वन्यप्राणी, पक्षी, वनस्पतीजीवन व एकूण निसर्गसौंदर्याचे संधारण करणे.

वनव्यवस्थेमध्ये वरील तिन्ही अंगांचा विचार सारख्याच प्रमाणात होईल असे मानण्याचे कारण नाही. व्यवस्थेखाली आणावयाच्या वनक्षेत्राच्या सुप्त–क्षमतेच्या अनुषंगाने व्यवस्थापनाचे मुख्य उद्दिष्ट ठरवावे लागते. म्हणून उद्दिष्टपूर्तीसाठी व्यवस्थापनाच्या तीनपैकी एकास प्राधान्य तर इतर दोन अंगांस गौणत्व असे महत्त्व द्यावे लागते. भारतातील संपूर्ण वनक्षेत्रांचे या पद्धतीने वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे भारतातील वनक्षेत्रांची १९६६–६७ ची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. संरक्षण-वने | १०.०० | दशलक्ष हेक्टर | १३.३ | प्रतिशत |
| २. उत्पादन-क्षम वने | ६५.०० | ,, | ८६.७ | ,, |
| ३. उत्पादक-वने. | ५९.२ | ,, | ८.६ | ,, |
| ४. करमणुक-क्षेत्रे, इतर क्षेत्रे | ६.१ | ,, | ८.१ | ,, |

संरक्षक वनामध्ये खूप डोंगराळ, दुर्गम अशी क्षेत्रे की, जेथे जमिनीची धूप, कडे-कोसळणे, वाहत्या पाण्याचे नुकसान इत्यादि बडामोडी संभवतात; अशा वनक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

उत्पादन क्षम वने या प्रकारात मिश्रजाती निकृष्ट दर्जाच्या वनक्षेत्रांचा समावेश आहे. या वनांची सुप्तक्षमता चांगली आहे व ती वनक्षेत्रे चांगले व्यवस्थापन करून, व्यापारी किंवा उत्पादक वने या प्रकारची होऊ शकतात.

उत्पादक वने किंवा व्यापारी वने ही व्यापारी धोरणाने व्यवस्थापन होत असलेली क्षेत्रे आहेत.

करमणूक–क्षेत्रे किंवा इतर क्षेत्रे ही राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, उद्याने, वन-ग्रामे यांनी व्याप्त क्षेत्रे आहेत.

## मुख्य उद्दिष्टचे

वरील वनप्रकारांच्या नावांवरूनच त्यांच्या वनव्यवस्थेच्या मुख्य उद्दिष्टाची कल्पना सहजच येते. संरक्षणवनांत संधारण हे अंग मुख्य तर उत्पादन व सौंदर्यमूल्यजोपासना ही त्या मानाने गौण अंगे असतात. उत्पादनक्षम वनांत सुप्तक्षमता असल्याने जास्तीत जास्त उत्पादन घेणे हे अंग प्रधान असते, तर संधारण व सौंदर्य-मूल्यजोपासना ही अंगे गौण असतात – उत्पादक वने व्यापारी वने आहेत. उत्पादन घेणे हे प्रमुख अंग, इतर अंगे यात गौण आहेत.

"मोनोकल्चर" या वनजोपासना प्रकाराच्या बाबतीत टीकेची झोड उठविणाऱ्यांचे लक्ष या उपरोल्लेखित वनवर्गीकरणाकडे मुद्दामच वेधावेसे वाटते. व्यवस्थापनेचे एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील उद्दिष्ट कोणते आहे व व्यवस्थेच्या कोणत्या अंगास प्राधान्य दिले जात आहे याचा ताळेबंद करूनच टीका होऊ शकते. अन्यथा ती अनाठायी ठरण्याची शक्यता नाकारता येणार नाही. यासाठी 'महाराष्ट्र वनविकास महामंडळा'ने उभारलेल्या सागवान रोपवनाचेच उदाहरण देता येईल. महामंडळा-

कडे वर्ग करण्यात आलेली वने, उत्पादन-क्षम वने आणि व्यापारी किंवा उत्पादक वने या वर्गवारीपैकीच आहेत. या क्षेत्रांतून परिमाण, गुणवत्ता व मौलिकता या तिन्ही पातळींवर अधिकोत्तम उत्पादन घेणे हेच व्यवस्थापनेचे मुख्य उद्दिष्ट आहे संधारण व सौंदर्य-मूल्यजोपासना ही अंगे या क्षेत्रात गौणच मानलेली आहेत. महामंडळाच्या वनरोपणाचे मूल्यमापन या दृष्टिकोनातून झाले पाहिजे. बागायती पिकांच्या बाबतीत उदा. संत्र्याची लागवड करून त्या संत्र्याच्या जातीचे मोनोकल्चर करणे, यात बागायतदाराची चूक ती कोणती ? शेती किंवा बागायती उत्पादनाच्या बाबतीत "मोनोकल्चर" हा व्यवस्थापनप्रकार मान्यताप्राप्त आहे. इमारती लाकूड देणाऱ्या सागवानी रोपवनांबाबत हा वनजोपासनाप्रकार मात्र अद्याप मान्यताप्राप्त नाही. केवळ म्हणूनच महामंडळाचा दृष्टीकोन व्यापारी आहे. संधारण व सौंदर्य-मूल्य-जोपासना ही अंगे दुर्लक्षित होत आहेत, ही टीका चूक व अवास्तव आहे.

सुलभ व्यवस्थेच्या दृष्टीने मूळच्या जंगली गहू, ज्वारी, तांदूळ इत्यादि गवतांची कालांतराने 'शेती' या स्वरूपात लागवड झाली. शेती हे सुद्धा एक मोनोकल्चरच आहे. त्याच त्याच पिकांची विस्तृत लागवड करून घेतल्या जाणाऱ्या या शेतीची मात्र टीकाकारांना दखलसुद्धा घ्यावीशी वाटत नाही. कारण ती मान्यताप्राप्त आहे. लागवडी पाठोपाठ शेतीची उत्तरोत्तर चांगली मशागत, निवडक जाती, सुधारित संकरित जाती अशी उत्क्रांती झाली आहे. जंगली फळझाडाचे प्रथम बगीचे झाले. निवडक जातीच्या फळ झाडांची लागवड, कलमे करणे, पार्थिनाजेनेसीसचा किंवा टिश्यूकल्चरचा उपयोग करणे आणि बिनबियांच्या फळांचे-द्राक्षे, संत्री, लिंबू, पपई आणि आता आंबा यांचे बगीचे करणे अशी बागायती पिकांची उत्क्रांती झाली. अशा प्रकारे सर्व प्रगत जातींचा उगम 'मोनोकल्चर' या जोपासना-प्रकाराच्या उत्क्रांतीतून आहे. याच संदर्भात इमारती सागवान वृक्षांच्या एकजाती वन किंवा मोनोकल्चर या पद्धतीच्या जोपासनेस आक्षेप का बरे असावा ? वास्तविक मोनोकल्चर हा वन-व्यवस्थाप्रकार त्यामानाने नवा आहे. अलीकडेच सागाची बीजउत्पादन क्षेत्रे, बीजगुणन क्षेत्रे, कलम बांधून जोपासना आणि टिश्यूकल्चरने उत्पादन शक्य झालेले आहे. हे साग या एकमेव जातीविषयीचे काम. इतर वृक्षजातींच्या बाबतीत आपण अजून अंधारातच चाचपडत आहोत; पण साग या जातीच्या संदर्भातील या अल्प अशा प्रगतीचे मूळसुद्धा मोनोकल्चर या जोपासना-प्रकारातच शोधावे लागेल. हिरडा, बेहेडा आणि आवळा या त्रिफळांना आयुर्वेदात फारच महत्त्व आहे. जंगलात ही फळझाडे विखुरलेली आढळून येतात. न जाणो उद्या या फळांचे महत्त्व अधिकच वाढेल. त्यांची लागवड, मशागत व उत्पादन मोनोकल्चर पद्धतीने होईल. निवडक जात, सुधारित संकरित जात आणि बिनबियांची जात, या उत्पादनांचीसुद्धा होऊ शकेल. या आज अस्तित्वात नसलेल्या हिरडा, बेहेडा, आवळा इत्यादींच्या फळबागांच्या निर्मितीस मोनोकल्चर विरोधकांचा अविष्कार विरोध राहील काय ?

## विपर्यस्त टीका

एकजाती वनजोपासनेमुळे जमिनीची प्रत, पोत-रचना बिघडते, असे एक टीकेचे कारण. शेतीचे उत्पादन,वनोत्पादनाच्या तुलनेत त्याच त्याच जमिनीतून पुन्हा पुन्हा व थोड्याच आवर्तन कालानंतर घेतले जाते. अशा या सातत्याच्या शेतीउत्पादनासाठी जमिनीतील पोषक द्रव्ये वेगाने व सतत उपसली जातात. शेतजमिनीचा कस लवकर उतरतो. म्हणून शेतीची मशागत पुन्हा पुन्हा केली जाते. रासायनिक सेंद्रीय, हिरवी खते मिसळावी लागतात तरच शेतजमिनीची रचना, पोत व प्रत टिकून राहाते. जमिनीतील उपयुक्त जीवाणू पोसले जातात. 'सजीव जमीन' ही एक वैज्ञानिक संकल्पना आहे. जमीन सतत तशी राहावी म्हणून मशागत व खते यांची योजना सातत्याने करावी लागते. वनांच्या बाबतीत एकाच वनक्षेत्रातील दोन तोडींमधील आवर्तनाचा काळ प्रदीर्घ असतो. तो १०,२०,४०,८०, १००,१२० वर्षे इतका किंवा यापेक्षासुद्धा जास्त प्रदीर्घ असतो. त्यामुळे एकाच वृक्षजातीची लागवड करूनसुद्धा, एखादे क्षेत्र फारच थोडा काळ उघडे-बोडके राहाते. वनजमिनी-मोनोकल्चरच्या मशागतीखाली का असेनात, बहुतेक काळ त्या गवत, तण, झुडुपे इतर वृक्षजातींचे फुटवे यामुळे सदैव आच्छादित असतात. त्यामुळे वनजमिनीच्या बाबतीत धूप होणे, सजीवपणा नष्ट होणे, रचना, पोत वा प्रत घसरणे इत्यादि प्रश्नच उपस्थित होत नाहीत. असे असूनसुद्धा केवळ एकजाती वृक्षलागवडीच्या बाबतीत अगदी विपर्यस्त अशी टीका होते.

एकजाती वनांवर कीटक, बुरशी आदि रोगराईंचा प्रादुर्भाव व विस्तार चटकन होतो हा टीकाकारांचा दुसरा मुद्दा. एक तर सर्वच वने, मोनोकल्चर पद्धतीने वाढविली जात नाहीत. संरक्षण वने सौंदर्य-मूल्यांसाठी जतन केलेली वने या पद्धतीच्या व्यवस्थेखाली जोपासली जात नाहीत. ही मिश्रजाती वने मोनोकल्चर क्षेत्रामध्येच विखुरलेली असतात. याखेरीज, एकजाती लागवडीच्या सभोवार, तोडीच्या वेळी उभ्या प्रजातींच्या वृक्षांची एक पट्टी, तशीच न तोडता उभी राखून ठेवण्यात येते. या निरुंद मिश्रजाती झाडोऱ्याच्या पट्ट्या कीटक, बुरशी आदि जीवाणूंच्या प्रसारास अटकाव करतात. सलग एकसंध विस्तृत प्रदेशांचे या पट्ट्यांतील झाडोऱ्यामुळे लहान भाग पडतात व त्यांचा अडथळ्यासारखा उपयोग होतो. हा अडथळा प्राकृतिक व या जीवाणूंच्या जीवनचक्रात अडसर अशा दोन स्वरूपांत असतो. याशिवाय कीटक व बुरशी–नाशकांची फवारणी करून, शेतीप्रमाणेच या वनजोपासनाप्रकारात, सोइस्करपणे रोगराईच्या प्रसाराच्या बंदोबस्त करता येतो. या आजूबाजूच्या मिश्रजाती वनांतील राखून ठेवलेल्या पट्टीतील झाडोऱ्यांत, बीजधारणा होते व बियांचे नैसर्गिक प्रसरण होते. एकजाती वनक्षेत्रांतसुद्धा या बिया पडतात, रुजतात आणि या क्षेत्रांतसुद्धा इतर प्रजातींचा चंचुप्रवेश होतो व त्या वाढीस लागतात. रोपवनाची मशागतीची पहिली तीन वर्षे ७ वे, १० वे, २० वे आणि ४० वे अशी रोपवनक्षेत्रात सफाईची व विरळणीची कामे होणारी मोजकी वर्षे वगळून इतर काळात या एकजाती वनक्षेत्रात अनेक प्रजाती फोफावतात. उष्णकटिबंध आणि समशीतोष्ण कटिबंधातील क्षेत्रात तर अशी इतर प्रजातींची वाढ आक्रमक असते. तसेच रोपवनक्षेत्रात फळझाडे, विरळपणे छताच्या निवडक प्रजाती उदा. काटसावर, कुलु, आवळा, चिंच इत्यादि रोपवनात राखून ठेवल्या जातात. तसेच सफाई व विरणीच्या वेळी लागवड केलेले रोप सुदृढ वाढत नसल्यास, तेथे जागा मोकळी पडू देण्याऐवजी इतर प्रजातीचे नैसर्गिकरीत्या वाढलेले झाड राखून ठेवण्यात येते. तसेच बहुतेक तोडलेल्या प्रजातींच्या खुंटाना जोमदार फुटवे येतात. त्यामुळे एकजाती लागवडक्षेत्रात प्रजातीची चांगलीच सरमिसळ होते. ही क्षेत्रे अगदी एकजातीवन या स्वरूपात फारच अल्पकाळ राहतात. त्या क्षेत्रांतून इतर प्रजातीचे कायमचे उच्चाटन होण्याचा धोका उष्ण आणि समशीतोष्ण कटिबंधातील क्षेत्रात तरी संभवत नाही.

## दुष्परिणाम अशक्य

अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया इत्यादि प्रगत आणि मनुष्यबळ कमी असलेल्या प्रदेशात मोनोकल्चर या वनजोपासनाव्यवस्थेचा प्रसार फारच विस्तृत प्रमाणात वेगाने व यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून झाला. याखेरीज समशीतोष्ण, शीत व अतिशीत कटिबंधीय प्रदेशात, प्रजातीची विविधता अभावनेच आढळते. यामुळे प्रजातीची यांत्रिकीकरणाने झालेली हानी, तेथे प्रकर्षाने दिसून आली असावी. यांत्रिकीकरणाच्या आहारी जाणे व मुळातच विविधतेची उणीव असलेली वने यामुळे एकजाती लागवड, या वनजोपासना प्रकाराविरुद्ध युरोपिय देशांतून टीकेची रास्त अशी झोड उठली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या टीकेचे अनुकरण करून भारतात आणि इतर उष्णकटिबंधातील प्रदेशात मोनोकल्चर वनजोपासना प्रकारची टीका इष्ट होणार नाही. भारत, चीन यांसारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशांत असे यांत्रिकीकरण संभवत नाही. ज्या वातावरणीय कारणास्तव उष्णकटिबंधात मनुष्यप्राणी व इतर प्राण्यांची भरभराट व विविधता आढळून येते, त्याच कारणास्तव जीवसृष्टीचे दुसरे अंग वनस्पती, त्यांचीही भरभराट होते, विविधता आढळून येते. म्हणून उष्णकटिबंधात तरी मोनोकल्चरचे दुष्परिणाम संभवत नाहीत.

एकजाती वृक्षलागवडीमुळे वातावरणाची आणि सौंदर्य मूल्यांची हानी होते, हा टीकाकारांचा आणखी एक मुद्दा. समशीतोष्ण, शीत आणि अतिशीत कटिबंधातील प्रदेशात वनस्पतीच्या प्रजातींची संख्या निसर्गतःच कमी व मोजकी आहे. इतकेच नव्हे तर या सीमित प्रजातींची सरमिसळ कमी प्रमाणात आढळून येते. निसर्गतः एखादे विस्तृत क्षेत्र एकजाती वृक्षवनांनी व्यापल्याचे दिसून येते. ओक, स्प्रूस, फर या एकजाती वृक्षवनांचे उदाहरण घेता येईल. भारतातील हिमालयीन वनांचे समांतर असे उदाहरण होईल. हिमालयात समुद्रसपाटीपासून ३००० ते ७००० फूटापर्यंत चीड–पाईन, ६००० ते ८५०० फुटांपर्यंत देवदार, ६००० ते १०००० फुटांपर्यंत ब्लू–पाईन तर ७००० ते ११००० फूटांपर्यंत स्प्रूस व फर या वृक्षजाती, केवळ एकजाती वनाच्या

स्वरूपात निसर्गतः दिसतात. काश्मीर, कुलु–मनाली, सिमला, नैनिताल, रानीखेत आणि दार्जिलिंग ही हिमालयातील पर्यटनठिकाणे आहेत येथील नावाप्रमाणे सदाहरित हिरव्याकंच वृक्षराईची शोभा अवर्णनीय तर खरीच; पण ही वने एकजातीय म्हणून पर्यटकांचा या क्षेत्रांतील ओघ कमी झाल्याचे ऐकिवात नाही. आल्हादकारक वातावरणनिर्मिती किंवा सौंदर्य–मूल्य हे तेथे आढळून येणाऱ्या वृक्षराईवरच अवलंबून नाही. तेथील तपमान, आर्द्रता, बर्फवृष्टी, प्रदूषणाचा अभाव, भू–रचना या सर्व भौतिक घटकांच्या संतुलनाचा परिणाम म्हणून तेथील सौंदर्यमूल्याकडे पाहावे लागेल. उष्णकटिबंधात किंवा महाराष्ट्रात निसर्गनिर्मित एकजाती वने नाहीत. अनेक वर्षांच्या मशागतीमुळे, वारंवार लागणाऱ्या आगीमुळे आणि अशा वातावरणात सागवान या जातीच्या आक्रमक वाढीमुळे, मेळघाट (अमरावती) व इतर काही वनप्रदेशात जवळजवळ एकजाती झाल्याचे दिसतात. मेळघाटमधील सागवानी वनांची गल्लत मोनोकल्चर म्हणून मात्र कोणी करू नये; ते सागाचे नैसर्गिक मोनोकल्चर बनलेले आहे. असे असूनसुद्धा सौंदर्य ऋतुमानाप्रमाणे बदलते. मेळघाटमधील सागवान वनांचे सौंदर्य आजही पर्यटकांस विलोभनीयच वाटते. एकजाती वने तेथेही आहेत. वनश्री, डोंगर, दऱ्याखोऱ्या, वाहते पाणी आणि बहुढंगी प्राणी व पक्षीजीवन या सर्वांचा संतुलित परिणाम हे तेथील सौंदर्यमूल्याचे खरे कारण आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील चपराळा, आजाबल्ली येथील सागाची वने त्यामानाने कंटाळवाणी वाटतात. ती एकजाती वने आहेत म्हणून नव्हे, तर इतर निसर्ग घटकांची तेथे साथ नाही म्हणून ! मोनोकल्चर मग नैसर्गिक असो वा मानवनिर्मित, त्यामुळे सौंदर्यमूल्य हानी होते.

गहू, ज्वारी इत्यादि पिकांप्रमाणे, शेतात मशागतीची सर्व कामे करून वन–वृक्षजातींची लागवड करण्याचा वन शेती हा प्रकार नव्यानेच प्रचारात येत आहे. या वन शेतीत निलगिरी, सु–बाभूळ इत्यादि वृक्षजाती लावल्याची उदाहरणे आहेत. हा वनशेतीचा प्रकार मोनोकल्चर या जोपासनाप्रकाराची पुढची पायरी समजण्यास हरकत नाही. गुजरात राज्यातील अहमदाबाद शहरापासून बडोदा शहराकडे जाणाऱ्या राजमार्गावर वटवा हे गाव सात किलोमीटर अंतरावर आहे. गेल्या ४–५ वर्षांत या गावाची ख्याती जगभर पसरली आहे, ती या वनशेतीच्या पथदर्शक योजनेमुळेच. तेथे श्री. कालिदासभाई भगवानजीभाई पटेल यांनी आपल्या 'आदर्श फार्मवर' ही पहिली पद्धतशीर वनशेती केलेली आहे. या शेतीविषयीच्या निष्कर्षांपैकी काही संबंधित नोंदी मुद्दाम येथे देत आहे.

## निलगीरीच्या शेतीचे निष्कर्ष

निलगिरीची झाडे पाणी फार शोषून घेतात असे मानले जाते आणि ते खरेही आहे; पण या झाडांच्या लागवडीमुळे जमीन भुसभुशीत होऊन पाणी त्वरित जमिनीत मुरले जाते. १९७८–७९ आणि ८० मध्ये याबाबत वटवा फार्मवर निरीक्षण करण्यात आले. १९७८ च्या ऑगस्टमध्ये आणि ७९ च्या पण त्याच महिन्यात २४ तासांत १९ आणि १६ सें. मी. पाऊस पडला. इतर शेजारच्या शेतजमिनीवर पाणी आठ–दहा दिवस साचून होते. काही ठिकाणी पाण्याचे लोट वाहात होते; पण आदर्श फार्मच्या १८० एकरांवर दोन्ही वेळा संपूर्ण पाणी दीड ते दोन तासांत जमिनीत मुरले होते. आठ तासांनी चिखल पण आढळला नव्हता. म्हणजेच एका बाजूने झाडांच्या वाढीस पाणी खूप लागते हे खरे; पण ही झाडे त्याची परतफेड दुसऱ्या वर्षापासून पुरेपूर करतात.

निलगिरीच्या लागवडीमुळे आदर्श फार्मच्या जमिनीचा कस सुधारला. सहा वर्षांत तेथील जमिनीचा पी. एच. १/२ टक्के कमी झाला.

वनक्षेत्राची विचारपूर्वक करण्यात आलेली वर्गवारी, त्या वर्गवारीच्या अनुषंगाने होत असलेली वनजोपासना निसर्गतः आढळून येणारी एकजाती वृक्ष व इमारती लाकडे आणि इतर वनोत्पादनाचे अधिकोत्तम उत्पादन होण्याच्या दृष्टीने मशागततंत्र, वृक्षजोपासनेचे तंत्र व आवश्यक जातीच्या सुधारित उत्क्रांत जाती वैज्ञानिक मार्गाने मिळवणे, तसेच वनशेतीचे यशस्वी प्रयोगांचे निष्कर्ष या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास, उष्णकटिबंध प्रदेशात व यांत्रिकीकरण टाळून, मोनोकल्चर या वनजोपासना प्रकारचा अवलंब करणे धोक्याचे नाही. सध्या महाराष्ट्रातील आणि इतर उष्णकटिबंधातील वनक्षेत्रात होत असलेल्या एकजाती लागवडीविरुद्ध उठलेले टीकेचे मोहोळ, केवळ टीकेस टीका या स्वरूपाचे वाटते.

**( विभागीय व्यवस्थापक, मार्खंडा वन प्रकल्प विभाग, वन–विकास महामंडळ, बल्लारशाह )**

# धरण = विकास, प्रचंड धरण = प्रचंड विकास

# खरोखरचा किती ? कोणाचा ? कोणाच्या जिवावर ? काय किंमतीला ?

**विजय परांजपे**

स्व. पंडित नेहरूंनी भाक्रा-नांगलसारख्या धरण-प्रकल्पांचा ' आधुनिक भारताची तीर्थक्षेत्रे ' अशा सार्थ शब्दात गौरविले आहे. प्रत्येक देशाला, विशेषतः भारतासारख्या विकसनशील देशात धरणे अत्यावश्यक असतात हे सर्वमान्य आहे. मात्र आजवर धरण म्हणजे प्रचंड फायदा आणि प्रचंड धरण म्हणजे प्रचंड फायदा असे काहीसे विचित्र आणि दुर्दैवी समीकरण रूढ झाले आहे. त्यानुसार अनेक प्रचंड धरण-प्रकल्प योजले गेले आहेत.

असल्या धरणातून मिळणारी लखलखती वीज वा डोलणारी हिरवी शेते यांनी मोहून आपण धरण आणि विकासाची काहीशी गोंडस प्रतिमा निर्माण केली आहे; पण हा विकास खरोखर किती सच्चा, शाश्वत आणि न्याय्य आहे ? दुष्काळ, महापूर आणि उर्जा-टंचाई या गंभीर समस्यांवर प्रचंड धरण बांधणे हा एकच तोडगा आहे का ? असल्यास काय दर्शवतो ?

आज भारतात आणि महाराष्ट्रात अनेक प्रचंड धरणे बांधली जात आहेत. प्रत्येक ठिकाणी जंगल आणि आदिवासी गावे पाण्याखाली जाणार आहेत. जंगल आणि वनवासी-आदिवासी गावे नेमकी धरण-भागातच येतात हा जसा इतर समाजाचा दोष नाही, तसाच तो त्यांचाही गुन्हा नाही. धरण-प्रकल्पांच्या नफ्या-तोट्यात आपण सामाजिक-पर्यावरणाच्या समस्यांचे मूल्यमापन करणार आहोत की त्या ' गृहित ' धरणार आहोत ? विकास कोणाचा, कोणाच्या जीवावर आणि काय किमतीवर—या प्रश्नांना आपण डोळसपणे समोरे जाणार आहोत की नाही ?

' हाकारा ' च्या मागील अंकात ( जाने-मार्च १९८२ ) ' मेजर डॅमस् : ए सेकंड लुक ' या पुस्तकाच्या परिक्षणाच्या निमित्ताने आम्ही या महत्त्वाच्या प्रश्नावरील चर्चेस सुरुवात केली आहे. प्रा. विजय परांजपे यांच्या प्रस्तुत अभ्यासपूर्ण लेखाने या विषयाला आणखी चालना मिळेल अशी आशा आहे.

' हाकारा ' व ' महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषदे 'ला या विषयात विशेष आस्था आहे. या विषयासंबंधी कार्यकर्ते व इतर जाणकार यांची एकत्र बैठक-परिसंवाद योजण्याचाही प्रयत्न आहे. कार्यकर्त्यामित्रांनी याबाबतचे आपले विचार-सूचना अवश्य कळवाव्यात.—**संपादक**

विजयनगरच्या साम्राज्यापासून आणि नंतर मुसलमान राजवटीतही नद्यांतील जादा पाण्याचा संपूर्ण उपयोग करण्याच्या सर्व पद्धतीत आम्ही पारंगत होतो. आमच्या जवळजवळ सर्व जुन्या शहरांच्या नजीक असलेले 'तलाव' आणि 'झील' ह्या गोष्टीचीच साक्ष देतात. पुराच्या पाण्याची आपत्ती टाळण्यासाठी 'बंधारे' बांधले गेले आणि पवनचक्की, जिचा उपयोग हिमालयातील रहिवासी आजही धान्य दळण्यासाठी करतात, ते तर जलशक्तीचा उपयोग करणारे सर्वांत सुलभ आणि स्वस्त साधन आहे. जलशक्तीचा उपयोग करणाऱ्या या गोष्टीत मुख्यत: पावसाचे पाणी मोठमोठ्या टाक्यांतून कोंडणे आणि नंतर कालव्यांच्या सहाय्याने दुष्काळी, कोरड्या भागापर्यंत पोहोचविणे ह्या गोष्टीचाच समावेश होता. ही कामे लहानलहान नद्यांवर केल्यामुळे मोठ्या नद्यांच्या प्रवाहाला कोणत्याही प्रकारचा अडथळा येत नव्हता किंवा नैसर्गिक 'जलचक्राला' धक्का लागत नव्हता. (१७८९ मध्ये बांधले गेलेले यमुना कालवे व आर्थर कॉटनने १८३६ मध्ये बांधलेले Anicut हेच फक्त अपवाद ठरावेत).

परंतु बदलत्या काळात मोठमोठी धरणे बांधण्यावर भर दिला गेला व ब्रिटिश अमदानीत शंभरावर मोठी धरणे बांधली गेली. पूरग्रस्त लोकांना तात्पुरता रोजगार मिळवून देणे व त्यांच्यासाठी पाटबंधाऱ्यांची कायमची व्यवस्था करणे हाच ही मोठी धरणे बांधण्यामागील उघड हेतू होता. १८७८ व १९९८ मध्ये स्थापन झालेल्या 'दुष्काळ समितीने' व १९०१ मध्ये निर्माण झालेल्या 'पाटबंधारे समितीने' ही धरणे बांधण्याचा निर्णय घेतला होता. चालू शतकाच्या तिसऱ्या दशकात परदेशांतून सिमेंट आयात करून 'मिठूर' येथे पहिला सिमेंट–कॉंक्रीटचा बंधारा बांधला गेला; परंतु दुष्काळनिवारणाचे सर्व प्रयत्न चालू असूनसुद्धा १९४३–४४ मध्ये देशाला तीव्र दुष्काळाला तोंड द्यावे लागले.

चालू शतकाच्या पूर्वार्धात बांधकाम करणे फारसे खर्चाचे नव्हते. कारण आर्थिक घडामोडींना जोमाने सुरुवात झाली नव्हती. शिवाय पाटबंधाऱ्यांवर खर्च केली जाणारी रक्कम एकूण खर्चाच्या मानाने फारच थोडी होती.

भूपृष्ठाखालील पाण्याच्या उपयोगासंबंधी फारच थोडे तांत्रिक ज्ञान अवगत होते. पाण्याने वाहून आणल्या जाणाऱ्या गाळाच्या बदलत्या प्रमाणाविषयीही फारच थोडी माहिती उपलब्ध होती. त्याचप्रमाणे फार मोठा जलस्तंभ (पाण्याचा साठा) कोंडला गेल्यामुळे होणाऱ्या भूवैज्ञानिक परिणामाचे महत्त्व सिद्ध झाले नव्हते. म्हणूनच दुष्काळ आणि महापूर ह्या दोन्ही संकटांवर मोठाली धरणे बांधणे हा एकच तोडगा होता.

स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या धरणांचे महत्त्व वाढतच राहिले आणि हिराकूड, दामोदर यांसारख्या भव्य धरणांची निर्मिती झाली. भाक्रा–नानगल प्रकल्पाच्या पूर्ततेनंतर 'प्रगतिपथावरील मंदिरे व स्मारके' असाच धरणांचा निर्देश करण्यात येऊ लागला जलविद्युतकेंद्रातून निघालेल्या तारांच्या पलटणी आणि कालव्यांच्या दुतर्फा सळसळणारी हिरवीगार शेते यामुळे जनमानसात धरणांची इतकी आकर्षक प्रतिमा तयार झाली होती की, धरणांवरील खर्च व त्यांचे फायदे यांचे योग्य मूल्यमापन करणे अनावश्यक वाटत होते. धरणांमुळे फार मोठ्या भूभागाला पाणीपुरवठा झाला व मोठे दुष्काळ ही असंभवनीय गोष्ट झाली, याबद्दल कुणाचेच दुमत होण्याचे कारण नाही १९५०-५१ मध्ये पाणीपुरवठा झालेल्या एकूण २०९ लाख हेक्टरपैकी ६८.४% पाणीपुरवठा कालवे व विहिरी यांपासून झाला होता, तर १९७३–७४ मध्ये पाणीपुरवठा झालेल्या ३२६ लाख हेक्टरपैकी ८०% पुरवठा विहिरी व कालवे यांपासून झाला होता. पाणीपुरवठा झालेल्या जमिनीचे प्रमाण १९५१ मध्ये १७.६% होते ते १९७४ पर्यंत २३% इतके वाढले; परंतु धरणप्रकल्पांचे मूल्यमापन करण्यास प्रतिबंध करण्याइतकी ही प्रगती पुरेशी नाही. आजपर्यंत राज्य पाटबंधारे खात्यातर्फे धरणप्रकल्पांच्या परिणामाचे विश्लेषण करण्याचे कोणतेच प्रयत्न झालेले नाहीत, ही धक्कादायक गोष्ट आहे.

नियोजन समितीने १९५८ नंतर केलेल्या सारडा कालवा, गंग-कालवा, त्रिवेण-कालवा, दामोदर-कालवा, कावेरी, मिठूर व निजामसागर या प्रकल्पांच्या पहाणीचा उल्लेख येथे करणे आवश्यक आहे. संकल्पित प्रकल्पांची संभवनीयता पडताळून पहाण्यासाठी अधिक सोयिस्कर कसोटी ठरविण्याच्या दृष्टीनेच ही पहाणी करण्यात आली होती. या पहाणीनंतर नियोजन समितीने (Planning commission) काही गुणवत्ता कसोट्या तयार केल्या. कोणत्याही प्रकल्पाने ह्या कसोट्या पूर्ण

केल्याशिवाय त्यास आर्थिक अनुदान मिळत नसे. १९६४ पर्यंत आर्थिक उत्पादनक्षमतेविषयी असलेल्या कसोट्या अपुऱ्या किंवा संदिग्ध होत्या. ह्या कसोट्यांचा अपुरेपणा जाणवल्यावर फायदा-व्यय-कसोटीचा ( Benifit–cost criterion ) उपयोग करण्यास सुरुवात झाली. प्रत्येक प्रकल्पापासून फायदे हे त्या प्रकल्पावर केल्या जाणाऱ्या खर्चाइतके किंवा जास्त असले पाहिजेत हे तत्व लागू करण्योत आले व फायदा-खर्चाचे १ : ५ हे प्रमाण ठरविण्यात आले; परंतु सरकारी अधिकाऱ्यांनी व यंत्रज्ञांनी ह्या कसोट्यांचा मूळ उद्देश बाजूस सारला व प्रकल्पाची संभवनीयता ठरविताना प्रकल्प सर्व कसोट्या उत्तम तऱ्हेने पूर्ण करतो आहे, असे भासविण्याची खबरदारी घेतली. नियोजनसमितीकडून आर्थिक मदत मिळवणे हाच यामागील एकमेव उद्देश होता. हे अंदाज वस्तुस्थितीला धरून नव्हतेच. तज्ज्ञांच्या समितीने केलेल्या पहाणीत असे आढळून आले की, प्रकल्पाच्या प्रारंभी केले गेलेले खर्चाविषयीचे अंदाज साफ चुकले होते व खर्च १०८% इतक्या प्रचंड प्रमाणात वाढले होते. व्यय-फायदा गुणोत्तरावर ह्या घटनेचा धक्कादायक परिणाम होतो, हे स्वाभाविकरीत्या कळू शकेल आणि एवढे असूनही आरंभी केलेले खर्चविषयक अंदाज योग्य आहेत किंवा नाहीत हे तपासून बघण्यासाठी कोणतीही पद्धती अस्तित्वात नाही. परिणामतः नवीन प्रकल्पांची संभवनीयता ठरविताना पूर्ण झालेल्या प्रकल्पांविषयीचे अनुभव लक्षात घेतले जातातच असे नाही.

प्रकल्पांचे साकल्याने (सुयोग्य) मूल्यमापन करण्याच्या आड काही निर्विवादपणे गृहीत धरलेल्या गोष्टी येतात. सर्वांत प्रामुख्याने गृहीत धरलेली धोकादायक गोष्ट म्हणजे प्रकल्पापासून मिळणारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे इतके प्रचंड आहेत की, खर्चातील वाढ किंवा प्रकल्प पूर्ण होण्यास झालेला उशीर यांचा फारसा परिणाम त्यांच्यावर होत नाही. याखेरीज प्रकल्पाचे फायदे मुख्यतः ग्रामीण भागातील गरीब जनतेला मिळतात व मानवी जीवनावर धरणांचा कोणताही दुःष्परिणाम होत नाही असेच मानले जाते. **जलशक्तीपासून होणारी विद्युत्‌निर्मिती ही इतर कोणत्याही शक्ती-ऊर्जेपासून होणाऱ्या विद्युत्‌निर्मितीपेक्षा अधिक किफायतशीर असते असेच समजले जाते. थोडक्यात दुष्काळ, महापूर आणि ऊर्जाटंचाई या तीन गंभीर प्रश्नांवर** धरणे बांधणे हा एकच तोडगा आहे असे गृहीत धरले जाते.

## धरणांकडे आणखी एक दृष्टिक्षेप

१९७९ पर्यंत केन्द्रशासनाने ७५८९१ कोट रुपये खर्च केले. त्यापैकी १०५५६ कोट रुपये म्हणजेच १३.९% खर्च निरनिराळ्या लहान-मोठ्या धरणांवर व कालव्यांवर झाला. आजमितीला १५०० हून अधिक मोठी धरणे भारतात अस्तित्वात आहेत. सहाजिकच एवढ्या मोठ्या प्रमाणावर घडणाऱ्या घडामोडी केवळ गृहीत धरलेल्या गोष्टींवर व समजुतींवर तशाच पुढे चालू ठेवणे योग्य नव्हे. प्रत्येक मोठ्या व मध्यम प्रकल्पाच्या खर्चाच्या अंदाजाची सतत तपासणी करीत रहाणे जरूरी आहे.

(Culturable Command Area (CCA) १०००० हेक्टर किंवा त्याहून जास्त असल्यास त्या प्रकल्पास मोठा व ५००० ते १०००० हेक्टर असल्यास त्या प्रकल्पास मध्यम मानले जाते.)

गेल्या तीन वर्षांत उत्तर भारतात (उत्तर प्रदेश, बिहार, आसाम) आलेले महापूर पूर्वी कधीही आलेले नव्हते. तसेच महाराष्ट्रात कोयना धरणाच्या बांधकामानंतर झालेल्या भूकंपाने व नुकत्याच गुजराथेत मोर्वी व मच्छू येथे घडलेल्या दुर्घटनेमुळे अशा प्रकल्पातील प्रचंड धोकेही आपल्या नजरेसमोर आले आहेत. मोठ्या धरणांच्या उपयुक्ततेविषयीचा आरंभीचा उत्साह मावळून योग्यायोग्यतेचा नीट विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. जोखमीच्या कामात खाचखळगेही (अडचणी) मोठेच असतात, हे अनुभवानेच सिद्ध झाले आहे आणि मग प्रश्न असा उभा राहतो की, आपण चुकत तर नाही ना ?

धरणांविषयीच्या गृहीत गोष्टी आजच्या काळातही कितपत टिकाऊ ठरतात हे तपासून बघितले पाहिजे. भारतातील मोठ्या व मध्यम धरणांच्या बाबतीत बऱ्याच गृहीत गोष्टी चूक ठरतात हे सप्रमाण सिद्ध करता येईल. प्रस्तुत लेखाची मध्यवर्ती कल्पना हीच आहे.

वाढत्या किंमती आणि काम पूर्ण होण्यास लागणारा विलंब यांचा फारसा परिणाम न होण्याइतके मोठ्या धरणांपासून मिळणारे फायदे प्रचंड आहेत का ? धरणांपासून मिळणारा पहिला मोठा फायदा म्हणजे

पाणीपुरवठा व त्यामुळे शेतीउत्पादनात होणारी वाढ! निव्वळ नफ्याचा विचार करताना असे गृहीत धरले जाते की, पाणीपुरवठ्याचा १००% उपयोग केला जात आहे; परंतु प्रत्यक्षात मात्र काही ना काही कारणांनी पाणीपुरवठा होणे शक्य असलेल्या ८.८ दशलक्ष हेक्टर जमिनीपैकी फक्त ७.२ दशलक्ष हेक्टर जमिनीलाच पाणीपुरवठा होत आहे! म्हणजेच पाणीपुरवठा होणे शक्य असूनही १.६ दशलक्ष हेक्टर जमीन पाणी वापरीत नाही. खाजगी पाहणीनंतर असे दिसून आले आहे की, अनेक प्रकल्पात पाणीपुरवठ्याची सुविधा १५ वर्षांपेक्षा अधिक काळ उपलब्ध करूनसुद्धा २०% पेक्षा जास्त पाण्याचा उपयोग केला जात नाही. म्हणजेच ८०% क्षमतेचा उपयोग केला जात नाही पवना धरणाच्या पाणलोटक्षेत्रात नुकत्याच केल्या गेलेल्या पहाणीत असे आढळून आले आहे की, पश्चिम महाराष्ट्रातील हे धरण बांधून आठ वर्षे झाली तरी पाणीपुरवठ्यायोग्य जमिनीपैकी फक्त १३% जमिनीलाच पाणीपुरवठा होतो आहे. ह्या वस्तुस्थितीचा उघड परिणाम असा होतो की, व्यय-फायदा-गुणोत्तर त्या प्रमाणात कमी होतो. (१९६३ महाराष्ट्र सरकारच्या अहवालाप्रमाणे भीमाप्रकल्पाचे व्यय-फायदा-गुणोत्तर ६:२९ असे होते तर १९७४ मध्ये प्रकल्प पूर्ण झाल्यावर हे गुणोत्तर १:७४ इतके कमी झाले होते. १९८० मध्ये सर्व खर्चाची तोंडमिळवणी झाली तेव्हा हे गुणोत्तर प्रमाण ०९ इतके कमी झाले होते. नैसर्गिक साधनसंपत्तीचे झालेले नुकसान व रहिवाशांच्या पुनर्वसनाचा खर्च वजा जाता हे प्रमाण .४६ इतके कमी झाले.)

## जाणीव असूनही दुर्लक्षच

अंदाज केलेल्या प्रमाणापेक्षा प्रत्यक्ष गुणोत्तरप्रमाणात पडणाऱ्या प्रचंड तफावतीचे मुख्य कारण खर्च व फायद्यांविषयी केले गेलेले चुकीचे अंदाज हे होय. धरणाच्या खर्चाविषयीचे हे अंदाज सातत्याने प्रचंड प्रमाणात चुकीचे ठरत आहेत या गोष्टीची सरकारी अधिकाऱ्यांना पूर्ण जाणीव असूनही धरणांचा प्रारंभीचा खर्चविषयक अंदाज सतत कमीच दाखवला जातो, ह्या गोष्टीवरच आमचा रोख आहे. पाटबंधारे खात्यावरील जनतेच्या विश्वासाला तडा जात आहे. ह्या घटनेच्या काही कारणांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे.

(अ) धरणाच्या बांधकामासाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीच्या किमती भयानक प्रमाणात वाढल्या आहेत. याउलट फायदे (शेतीउत्पादने, धान्य, फळफळाव, भाजीपाला इ. किमती) त्या प्रमाणात वाढले नाहीत. किमतींमधील या असंतुलित वाढीमुळे व्यय-फायदा-गुणोत्तर-प्रमाणाला धक्का बसला आहे.

(ब) प्रारंभी पुरेशी तपासणी न केल्यामुळे गृहीत न धरलेल्या अनेक गोष्टींवर जादा खर्च करावा लागतो. (पूल, कालव्यांचे फाटे इ.) तसेच नुकसानभरपाई व पुनर्वसनाचा खर्च वाढत जातो (कारण पाटबंधारे खात्याने ठरविलेल्या जमिनीच्या किमती बहुधा अन्याय्य प्रमाणात कमी असतात)

(क) किमतीत भरमसाठ वाढ होण्यास असणारे एक प्रमुख कारण म्हणजे अनेक प्रकल्प पूर्ण होण्यास लागणारा उशीर. हा उशीर वाहतुकीच्या अडचणी, यंत्रसामुग्री किंवा कच्चा माल न मिळणे यासारख्या अनेक कारणांनी होतो. धरणे दुरुस्तीचा व नीट राखण्याचा खर्चही मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

(ड) सध्या अस्तित्वात असलेल्या अनेक योजनांत दोषपूर्ण Head work पाणी निचऱ्याची अयोग्य व्यवस्था यासारख्या अनेक तांत्रिक चुका आहेत.

(इ) भविष्यकालीन फायद्याचे प्रमाण कमी करणारे प्रमुख कारण म्हणजे पाण्याच्या साठ्यात (टाक्यांत) जलदगतीने साचणारा गाळ. पाणीपुरवठाक्षेत्राचे जतन करण्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केल्यामुळेच गाळ साठण्याची गती वाढते.

**अपुरी प्रारंभिक तपासणी, उशीर, अकार्यक्षमता, पाणलोटक्षेत्राची अपुरी व्यवस्था, किंमतीतील असंतुलित वाढ या कारणांना योग्य उपाय शोधल्याखेरीज धरणांपासून मिळणारा प्रचंड फायदा हे एक स्वप्नच राहील. जनतेची अशी समजूत करून दिली जाते की, खर्चापेक्षा फायदा जास्त असणारे प्रकल्पच हाती घेतले जातात व त्यापासूने खरोखरच प्रचंड फायदे मिळतात.**

आता मोठ्या धरणांच्यामुळे होणाऱ्या सामाजिक व परिस्थितिजन्य दुःष्परिणामांकडे लक्ष देऊ या. औद्योगिकरणामुळे व शहरीकरणामुळे होणाऱ्या प्रदूषणांविषयी पुष्कळच बोलले जाते; परंतु मोठमोठ्या धरणांमुळे सभोवतालच्या क्षेत्राचे जे प्रचंड नुकसान होते त्याबद्दल फारच थोडी वाच्यता केली जाते. तेव्हा अशा काही अडचणींची पुढे चर्चा करू.

**जमिनीची झीज :** धरण बांधताना सुरुवातीला पाणलोटक्षेत्राच्या आसपास अनेक लहान-मोठे रस्ते बांधले

जातात व असे रस्ते बांधताना बरीच जंगलतोड होते. डोंगरउतारावर रस्ते बांधले जातात आणि त्यासाठी पुष्कळ माती, मुरुम, खडक खोदला जातो. हे काम होणाऱ्या नुकसानाची पर्वा न करता केले जाते. कच्चे रस्ते योग्य पन्हळ अथवा आधाराशिवाय बांधले जातात एखाद–दुसऱ्या पावसाळ्यानंतर रस्ते धुपून जातात. ह्या धुपणीमुळे भूस्खलन होण्याची प्रक्रिया आणखी जलद होते. जमिनीच्या झिजेमुळे पाण्याच्या साठ्यात (जलाशयात) गाळ साठण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे धरणाची पाणी साठण्याची क्षमता कमी होऊन धरणाचे आयुष्मान कमी होते. निरनिराळ्या पहाणींतून असे दिसून आले आहे की, भारतातील धरणांची पाणी साठविण्याची क्षमता जलाशयात साचणाऱ्या गाळामुळे प्रतिवर्षी १·५ ते २% इतकी कमी होते. (जपान-मधील Tenrya नदीवरील यासुका (yasuoka) तलावाची क्षमता तेरा वर्षांत ८५% इतकी कमी झाली, तर नाइल नदीवरील अस्वान (Aswan) धरणामुळे तेथील शेतकरी तलावात साठणाऱ्या सुपीक गाळापासून मिळणाऱ्या फायद्यांना मुकले.)

नुकत्याच केल्या गेलेल्या अकरा तलावांच्या पहाणीत असे दिसून आले की, प्रत्येक शंभर चौरस किलोमीटर पाणलोटक्षेत्रात खडक बनविणारा गाळ साठणाऱ्या क्षेत्राचे प्रमाण सहा हेक्टरमीटर ते १६·६ हेक्टरमीटर इतके म्हणजे अपेक्षित प्रमाणाच्या दुप्पट ते पाचपट आहे. निजामसागर तलावाची ३६% क्षमता नष्ट झाली असून आता त्याच्यापासून केवळ ६००० हेक्टर क्षेत्रालाच पाणीपुरवठा होऊ शकतो. (प्रारंभी ११००० हेक्टर क्षेत्राला पाणीपुरवठा होत असे.) अशीच घट मयूराक्षी आणि घोड तलावांतही अपेक्षित आहे. अशीच धक्कादायक परिस्थिती इतरही अनेक ठिकाणी निर्माण झाली आहे. हिमालयातील नद्यांचे गाळ वाहून आणण्याचे प्रमाण सपाटीवरील नद्यांपेक्षा बरेच जास्त असल्याने तिथे हा धोका फार मोठ्या प्रमाणात जाणवेल. भारतीय पाटबंधारे–इतिहासात टेहरी (Tehri) धरण हे अशा प्रकारच्या संकटाचे सर्वांत मोठे उदाहरण ठरण्याची शक्यता आहे. टेहरी–गढवाल प्रदेशात जंगलतोडीमुळे आणि उतारावरील रस्त्यांमुळे अनेक भूस्खलनाचे (प्रस्तरभंगाचे) प्रकार घडले आहेत व यामुळे शेकड्यांनी जीवितहानी व कोट्यवधी रुपयांच्या साधनसंपत्तीचा नाश झाला आहे. या प्रदेशातील टेकड्या भौगोलिकदृष्ट्या इतक्या अस्थिर व कमकुवत आहेत की, लहानशा सुरुंगामुळे-देखील मोठ्या प्रमाणात भूस्खलन घडून येते व कृत्रिम सरोवरे तयार होतात. भागीरथीच्या वाढत्या दाबा-मुळे सरोवरे फुटून विध्वंसक पूर आले.

## वन्य प्राण्यांचा विनाश

मोठ्या धरणामुळे अनेक लहानलहान खेडी पाण्याखाली जातात आणि तेथील रहिवाशांचे पुनर्वसन करणे कठीण पडते. परिणामतः रहिवासी डोंगरातील अधिक उंच भागात जाऊन वस्ती करतात व उपजीविकेसाठी जंगलतोड करतात. ह्या जंगलतोडीमुळे जमीन उघडी पडते व जमीन व वनस्पती नष्ट होण्याची क्रिया जलद घडू लागते. जनावरे व इतर पाळीव प्राणी चरण्यासाठी नवीन कुरणांच्या शोधात जंगलात हिंडू लागतात व जंगली प्राणी अधिक घनदाट अरण्यात ढकलले जातात व शिकाऱ्यांच्या तावडीत सापडतात. पश्चिम महाराष्ट्रातील पवना, मुळशी आणि कोयना येथील 'कातकरी' लोकांना पूर्वी शेतांवर रोजगार मिळत असे; परंतु आता शेते पाण्याखाली गेल्यामुळे लहालहान भट्ट्यांतून तयार होणारा कोळसा विकण्याखेरीज त्यांना गत्यंतरच नाही. धरणांमुळे नैसर्गिकरीत्या होणाऱ्या जंगलतोडीपेक्षा अनेक पटींनी जास्त जंगलतोड होते. सदाहरित वनराई असलेल्या पश्चिम घाटात जवळ-जवळ वीस धरणे तयार होत आहेत. तेथील हजारो एकरांतील वृक्ष तोडले गेले आहेत किंवा येत्या दहा वर्षांत तोडले जातील. 'काळी 'च्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात २४३५० एकरांतील वृक्ष तोडले गेले आणि 'भेडती' धरणांमुळे २०००० एकर जंगल नष्ट होणार! सुप्रसिद्ध इडिक्की (Idukki) धरणामुळे हजारो एकरांतील हिरवीगार वनराई नष्ट झाली, जिची पुर्नर्निमिती अशक्यप्राय आहे. देशाच्या वनसंपत्तीविषयीच्या धोरणा-नुसार एकूण भूभागापैकी ३३% भूभाग जंगलाखाली असावा; परंतु प्रत्यक्ष पहाणीत फक्त २०·५% भूभागच जंगलाखाली आहे असे दिसून आले. खाजगी पहाणीत तर हे प्रमाण १६.५% इतके कमी आहे असे आढळले.

**भूकंप :** द्विपकल्प कवचामध्ये (Pennisul shield) बांधल्या गेलेल्या 'कोयना' धरणाला भूकंपाचा धोका नाही असे मानले जात असे; परंतु १९६७ मध्ये

कोंडलेल्या पाण्याच्या दबावामुळे भूगर्भशास्त्रात 'Strike-slip-movemeut ' म्हणून ओळखली जाणारी घटना घडली व त्यामुळे Risher scale वर सहापेक्षाही जास्त तीव्रता दाखविणारे भूकंपाचे धक्के लागोपाठ बसत राहिले. डिसेंबर ६७ मध्ये बसलेल्या धक्क्यामुळे दोनशेपेक्षा जास्त जीवितहानी झाली. अशाच प्रकारच्या घटना ऱ्होडेशियातील झांबसी नदीवरील कारीबा ( Koriba ) धरण, अमेरिकेतील Kremasta धरण आणि रशियातील अनेक धरणांबाबत घडल्या आहेत. १) पाण्याच्या पातळीच्या वाढीचे प्रमाण २) पाण्याच्या साठवणाचा काळ ३) पाण्याची उच्चतम पातळी ४) पाण्याची पातळी उच्च असण्याचा काळ या धरणांशी निगडित असलेल्या सर्व गोष्टींचा भू-पृष्ठाच्या हालचालींशी निकटचा संबंध आहे, असे शास्त्रीयदृट्या सिद्ध झाले आहे. म्हणून प्रत्येक धरणाच्या खर्चापैकी काही ठराविक रक्कम (साधारण १%) भूकंप निवारण निधी म्हणून वेगळी काढून ठेवली पाहिजे व असे संकट आल्यास संकटग्रस्तांना मदत किंवा दान म्हणून पैसे न देता नुकसानभरपाई हा त्यांचा हक्क मानून या कायम स्वरूपाच्या निधीतून पैसे दिले गेले पाहिजेत.

**महापूर** : धरणांमुळे नद्यांच्या प्रवाहात समतोल राखला जाऊन पुराचा धोका टळतो; परंतु साचणाऱ्या गाळामुळे धरणाची कार्यक्षमता कमी होऊन अचानक आलेला लोंढा थोपवू न शकल्याने पुराचा धोका उद्भवतो. कधीकधी पाण्याची पातळी जास्तीत जास्त किती होईल, याविषयीचे अंदाज चुकतात. धरण फुटू नये म्हणून जास्तीचे पाणी सोडणारे दरवाजे असतात; परंतु कधीकधी हे दरवाजे उघडूनही त्यांची क्षमता पुरी पडत नाही व धरण कोसळते. अशा वेळी जीवित व वित्तहानी फारच प्रचंड प्रमाणात होते. कारण धरणाच्या आसपासच्या क्षेत्रातील रहिवाशी पुराची मुळीच शक्यता नाही म्हणून निर्धास्त असतात. मोठ्या धरणांविषयीच्या जागतिक समितीने जगातील ८९२५ धरणांचा अभ्यास केल्यावर असे दिसून आले की, गेल्या १७५ वर्षांत ४५० मोठे अपघात घडून आले व यातील बहुतेक अपघात सदोष बांधकामामुळे व योग्य ती काळजी न घेतल्यामुळे घडून आले होते. फक्त १४ अपघात युद्धामुळे व भूकंपामुळे घडून आले. यावरून धरण फुटल्यामुळे होणाऱ्या प्रचंड नुकसानीला मनुष्य स्वतःच जबाबदार आहे ही गोष्ट दिसून येते. भारतात १९७४ पर्यंत बांधलेल्या ४३३ धरणांपैकी ४० धरणे फुटली. धरणे फुटण्याचे जागतिक प्रमाण ५.९ % इतके तर, भारतात ते ९.५% आहे ! म्हणूनच धरणाच्या एकूण खर्चापैकी निदान २% रक्कम तरी अशा अनपेक्षित संकटासाठी आधीच बाजूला काढून ठेवणे दूरदर्शीपणाचेच ठरेल.

## जलविद्युत खरोखरच स्वस्त आहे का ?

सध्या असे गृहीत धरले जाते की, जलविद्युत् सर्वांत किफायतशीर आहे. जलशक्ती हे नूतनीकरणाजोगे (renewable) साधन आहे. म्हणजेच एका वर्षात न वापरलेली जलशक्ती (ऊर्जा) कायमची नाहीशी होत नाही. याउलट कोळसा व तेल यांपासून मिळणारी शक्ती नूतनीकरणाजोगी नाही. म्हणजेच ह्या पिढीने वापरलेला प्रत्येक टन कोळसा पुढील पिढ्यांना उपलब्ध होऊ शकत नाही. शिवाय अशा प्रकारची शक्ती प्रदूषणापासून मुक्त असून नैसर्गिक संपत्तीचे नुकसान करीत नाही. जलशक्तीचा सर्वांत मोठा फायदा हा आहे की, प्रामुख्याने पाणीपुरवठ्याचे उद्दिष्ट असलेल्या धरणापासून ती सहजपणे मिळू शकते. विद्युत्‌निर्मितीचा खर्च फारच अल्प, प्रत्येक युनिटला ५ ते ७ पैसे, इतका असतो. त्यामुळे जलविद्युत्‌निर्मितीवर स्वाभाविकपणे भर दिला जातो. (येत्या १५ वर्षांत १०००० मेगावॅटइतकी उत्पानक्षमता असलेली धरणे बांधावीत अशा योजना आहेत.) केरळ-कर्नाटकातील काही धरणांचा (इडकी, सरस्वती, काळी (भेडती) जलविद्युत्‌निर्मिती हा एकमेव फायदा आहे. अशा विशिष्ट धरणांच्याबाबतीत जलविद्युत्‌निर्मितीचा खर्च बराच जास्त असतो. उदा. भेडती प्रकल्पाचा उत्पादनखर्च प्रत्येक युनिटला १८ पैसे इतका येतो. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हजारो एकर हिरवीगार वने या धरणांमुळे पाण्याखाली जातात. ह्या जंगलांपासून मिळणारे उत्पन्न प्रकल्पाच्या खर्चात मिळवले जात नाही, ही आश्चर्याची गोष्ट आहे. जलविद्युत्‌निर्मिती प्रकल्पाच्या जागेची निवड फारच विचारपूर्वक केली पाहिजे. कारण प्रत्येक जागी जलविद्युत्‌निर्मिती इतर प्रकारच्या विद्युत्‌निर्मितीपेक्षा अधिक किफायतशीर असेलच असे नाही. उदा. काळी प्रकल्प, ज्याचा एकमेव फायदा जलविद्युत् निर्मिती हा आहे. तेथील उत्पादनखर्च दर युनिटमागे १८ ते १९ पैसे गृहीत धरला आहे. शिवाय कित्येक एकर सदाहरित

जंगले या प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी तोडली गेली आहेत. त्यांचे उत्पन्न या खर्चात मिळवले तर प्रत्येक युनिट २२ पैशाला पडेल. इतर प्रकारच्या विद्युत्‌निर्मितीच्या साधनांपेक्षा हा खर्च बराच जास्त आहे.

ऊर्जासमस्येला आणखीही बाजू आहेत, ज्यांचा विचार आजतागायत केला गेलेला नाही. भारतातील ७० % जनता जंगलातील लाकूडफाटयाचा इंधन म्हणून उपयोग करते. त्यांना इंधनाची भव्य साधने (जल-विद्युत्‌सुद्धा) परवडण्याजोगी नसतात. ह्या लोकांना (लाकूड–फाटा) अल्प किंमतीत उपलब्ध होणे अत्यंत जरूर आहे. प्रचंड प्रमाणात जंगलतोड झाल्यास गरीब जनतेचा इंधन मिळवण्याचा हा मोठा मार्गच नष्ट होईल.

व्यापारी इंधनाच्या (commercial fuel) किंमतीत होणाऱ्या वाढीचा दर हा आमजनतेच्या दरडोई उत्पन्नापेक्षाही जास्त आहे. म्हणून जळाऊ लाकूड नष्ट करून केलेली विद्युत्‌निर्मिती अन्याय्य आहे. कारण तिचा वापर समाजातील आर्थिकदृष्टया सबल घटकच करू शकतील. गरीब जनतेपासून लाकडी इंधन हिरावून घ्यायचे नसेल तरच जलविद्युत् निर्मिती योग्य ठरेल व तसे घडणार नसेल तर मोठाच अन्याय होईल व आर्थिक विषमता वाढीस लागेल.

वरील विवेचनावरून प्रस्तुत लेखक धरणे बांधण्याच्या विरुद्ध आहे असा समज होईल, तो काही अंशी खरा असला तरी वस्तुस्थिती तशी नाही. भारताच्या आर्थिक इतिहासात धरणांची कामगिरी किती महत्त्वपूर्ण आहे याची पूर्ण जाणीव आम्हाला आहे. धरणांपासून मिळणारे फायदे केवळ गृहीत न धरता त्यांचे योग्य विश्लेषण करावे असा लेखकाचा आग्रह आहे. कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसलेल्या संशोधकांनी किंवा सामाजिक, शैक्षणिक संस्थांनी अशा धरणांपासून मिळणाऱ्या अप्रत्यक्ष सामाजिक फायद्या-तोटयाचा अभ्यास करावा व धरणांचे खरे स्वरूप उघड करावे. ह्यात कोणत्याही विशिष्ट सार्वजनिक संस्थेच्या अकार्यक्षमतेबद्दल दोषारोप करण्याचा हेतू नाही; परंतु जनतेच्या पैशाच्या बळावर चालणाऱ्या मोठ्या संस्थांच्या सर्वसाधारण प्रवृत्तीबद्दल नापसंती दर्शविण्याचा हेतू आहे.

(अ) कागदोपत्री आर्थिक लाभाचा काटा मोठ्या धरणांच्या बाजूला झुकलेला दिसला तरी भारतातील विशिष्ट परिस्थितीत (यंत्रसामुग्री व इतर साधने मिळण्यात येणाऱ्या अडचणी, अनेक प्रकल्प एकदम सुरू केल्याने आर्थिक सहाय्य वेळेवर न मिळणे, पुनर्वसनाच्या व नुकसानभरपाई देण्याच्या कामात अकार्यक्षमता व दिरंगाई) यामुळे लहान धरणेच अधिक लाभदायक ठरतील. लहान धरणांत ह्याच अडचणी लहान प्रमाणात असल्याने त्या लवकर सोडविता येतात. ह्या लेखाचा निष्कर्ष असा आहे की, फायदा–खर्च कमी प्रमाणात असणारी लहान धरणेच शेवटी अधिक फायदेशीर ठरतील. पाणी अडवणे व प्रत्यक्ष पाणीपुरवठा ह्यात कमी काळ जाईल व फायद्याची वाटणी समप्रमाणात होईल.

(ब) धरण फुटण्यामुळे होणारे नुकसान कमी असेल – मोठी व लहान धरणे फुटण्याची शक्यता जरी सारखीच असली तरी लहान धरण कोसळल्याने होणारे नुकसान मोठ्या धरणापेक्षा कमी असेल. तसेच लहान धरणामुळे भूकंप होण्याची शक्यता मोठ्या धरणांपेक्षा कमी असेल.

(क) धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अधिक सुलभ होईल–मोठ्या धरणांपेक्षा जास्त संख्येने लोकांना धरणांसाठी जागा द्यावी लागेल; परंतु आसपासच्या खेड्यांतून अशा निर्वासितांना सामावून घेणे जास्त सुलभ असते. याउलट मोठ्या धरणामुळे जागा नाहीशा झालेल्या सर्वांना आसपासच्या खेड्यांतून सामावून घेणे अशक्य असते. कारण निर्वासितांची संख्या प्रचंड असते. (कोयना धरणामुळे निर्माण झालेल्या निर्वासितांपैकी ७८१ कुटुंबांचे पुनर्वसन अजून व्हायचे आहे. कारण ३५००० निर्वासितांना आसपासच्या खेड्यांतून सामावून घेणे अशक्यच आहे.)

निर्वासितांच्या समस्या – ह्या लोकांनी कुठे जायचे ? ह्या लोकांच्या प्रश्नांना जबाबदार कोण ? हे लोक शहरात जाऊन गलिच्छ वस्त्यांत राहून भीक मागतात का ? पाटबंधारे व ऊर्जा खात्याने ह्या ज्वलंत प्रश्नांचा गंभीररीत्या विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. (एकट्या महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यांतच (सांगली, सोलापूर, सातारा, पुणे, कोल्हापूर, नगर) धरणांमुळे निर्वासित झालेल्यांची संख्या १६०००० इतकी आहे. आहे. हे निर्वासित केवळ २९ धरणांमुळे झालेले आहेत. मग भारतातील १५०० धरणांमुळे होणारे निर्वासित व त्यांच्या समस्या यांची कल्पनाच केलेली बरी. येत्या काही वर्षात ५०००००० लोक धरणांमुळे

निर्वासित होतील. (यात पुनर्वसन झालेले निर्वासित मोजलेले नाहीत )

राजकीय निर्वासितांविरुद्ध एवढा गदारोळ माजविणारे राजकीय पक्ष शासन लवकर व्यवस्था करू शकत नाही म्हणून ५० लाख लोकांच्या नशिबी बकाल आयुष्य येणार आहे त्याविरुद्ध कोणताच आवाज उठवीत नाहीत आणि ह्या गरीब जनतेच्या जिवावरच शहरीलोक ऊर्जा, शक्तीचा उपभोग घेत आहेत, घेणार आहेत.

नुकत्याच केल्या गेलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम आकाराच्या धरणाच्या (पवना) पहाणीनुसार असे आढळून आले आहे की, जमिनी, घरे इतर स्थावर मालमत्तेबद्दल दिली जाणारी नुकसानभरपाई मूळ किंमतीच्या केवळ ५०% असते. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी दिली गेलेली गावे त्यांच्या मूळ गावापासून ५० मैल दूर असतात. धरणग्रस्तांची परिस्थिती यामुळे अधिकच कष्टदायक झाली आहे. सर्व प्रकल्पांच्या खर्चाचा बोजा करदात्यांवर पडतो, याच गोष्टीचा विचार केला जातो; पण धरणग्रस्तांना जी किंमत मोजावी लागते त्याचा मुळीच विचार केला जात नाही. धरणांचा फायदा समाजातील एका घटकाकडून दुसऱ्या घटकाकडे जातो, त्यामुळे संपत्ती व उत्पन्न यांच्यातील फरक वाढतच जातो. धरणाचा संभाव्य खर्च व फायदा यांचा विचार करताना, वरील गोष्टींचा विचार केला जात नाही.

लेखाचा समारोप करताना काही सूचना कराव्याशा वाटतात, ज्यांचा उपयोग मोठ्या व मध्यम प्रकारच्या धरणांतील त्रुटी कमी करण्यासाठी केला जावा.

(अ) देशाच्या दृष्टीने सद्य:स्थितीलाच नव्हे तर भविष्यकाळातही महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या भौगोलिक व सामाजिक घटकांचा संबंधित अधिकाऱ्यांनी गंभीररीत्या विचार करावयास हवा. पाटबंधारे व ऊर्जा खात्याच्या अंदाजपत्रकात हे सामाजिक खर्च व फायदे मोजले जावेत.

(ब) धरणग्रस्तांना संपूर्ण नुकसानभरपाई ताबडतोब दिली पाहिजे. त्या कामासाठीं तज्ज्ञांची समिती नेमून तिला खास अधिकार दिले पाहिजेत. ह्या समितीच्या संमतीशिवाय प्रकल्प पूर्ण झाला असे प्रमाणपत्र मिळू नये. ठराविक कालावधीत पुनर्वसन न झाल्यास १५% अधिक नुकसानभरपाई मिळावी.

(क) धरण-बांधकामाबरोबरच, पाणीपुरवठाक्षेत्रात वृक्षसंवर्धनाला सुरुवात करावी. धरणाच्या सभोवतालचा १५०० फूट पट्टा हरितपट्टा म्हणून घोषित करावा व तेथील वृक्ष तोडण्यास बंदी करावी. 'देवराई' किंवा 'गावची जळाऊ लाकडासाठी असलेली राई' या संकल्पना पाणलोटक्षेत्रातील तसेच साठवणक्षेत्रातील खेडेगावात पुन्हा रूढ व्हाव्यात.

(ड) मोठ्या धरणांना दिले जाणारे अवाजवी महत्त्व कमी करून लहान धरणांना प्राधान्य दिले जावे. मोठ्या धरणाइतकीच पाणीपुरवठ्याची क्षमता असलेली लहान धरणांची मालिका तयार करावी व मोठ्या धरणापासून उत्पन्न होणारे धोके टाळावेत. □


॥ जय–सहकार ॥

## राधानगरी तालुका शेतकरी सहकारी संघ लिमिटेड, सरवडे

हेड ऑफिस : ५८३ ई, शाहूपुरी, कोल्हापूर
फोन नंबर : २४ ९४ १

शाखा : २०

| | | | |
|---|---|---|---|
| शेअर भांडवल | ४·३३ | गुंतवणूक | ४·५९ |
| रिझर्व फंड | ३·५५ | स्थावर मालमत्ता | ५·९७ |

( आंकडे लाखाचे आहेत )

- संस्थेकडे मुदत ठेवी शे. १२ टक्के व्याजाचे दराने स्विकारल्या जातात.
- राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ, नवी दिल्ली यांचे मार्फत ग्रामीण भागांत जीवनोपयोगी वस्तुंचा योग्य भावात पुरवठा केला जातो.
- राधानगरी तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना खते, तेले, कीटकनाशक औषधे, बियाणे, कौले, रेशन व जिवनोपयोगी वस्तूंचा योग्य भावात पुरवठा केला जातो.

वि. शि. खोराटे
प्रभारी प्रेसिडेंट

व्ही. बी. सवदी
जनरल मॅनेजर

शंकरराव धोंडी पाटील
मॅनेजिंग डायरेक्टर

## युगंधर

मी युगांचा क्रांत कैदी ।
आकळीना आमिषा ।
संपण्याआधीच माझ्या ।
काढिता अस्थी कशा ? ।। ध्रु० ।।
पेटण्याआधीच करता ।
का शवाचे तुकडे ।
धिंडवाड्याला म्हणा तर ।
गौरवाचे चौघडे ।।
आसवांतून ओघळावी ।
वीष झालेली नशा ।। १ ।।
मी कधी आक्रांत करतो ।
जात उघडी पेटता ।
क्रांतिवीरांची चिता मज ।
पेटवीते जीविता ।।
अस्मितेला मूठमाती ।
वंशविराणी दिशा ।। २ ।।
' रक्ष ' मी ! मज राक्षसाचा ।
सोंगटा तुम्ही दिला ।
मी युगे उभवीत आलो ।
यत्न माझा संपला ।।
सांगता करता कशाला ? ।
दाखवीता भरवसा ।। ३ ।।
कोण मी ? करणार का ? ।
हे रक्त माझे पेटते ।
कोपल्या जनसागरा ।
कल्लोळ होऊन ऊठते ।।
अग्नीसंस्कारी स्फुलींगे ।
चेतवीतील दश-दिशा ।। ४ ।।
माणसाने माणसाला ।
बाटण्याचे सोडले ।
अमृताने ओठ ओले ।
हृद विषाने गोठले ।
क्रन्दना ' हाकारीता ' ती ।
संपला रे पावशा ।
संपण्या आधीच माझ्या ।
काढिता अस्थी कशा ? ।। ५ ।।

—ल. सु. राजगडकर

# । कविता ।

# । कविता ।

## वीस रुपयात मलेरिया

भन्नाट चढलेल्या तापावर
दहा गोधड्या टाकूनही
थंडीने खलखलत होतो.
घामात भिजून—
एकदाचा ताप थंड झाला.
हिवतापाचं माझं मीच निदान केलं
मलेरिया-निर्मूलनाची शपथ घेतलेल्या
सरकारी दवाखान्यांत गेलो.
काचेवर रक्त दिलं
दिवसभर गिळायला पाच गोळ्या
घेवून परतलो.
' ब्लड रिपोर्ट आला की,
पाच दिवसांचा कोर्स देऊ. '
—डॉक्टर म्हणाले.
महिनाभर तापाने सतावल्यावर
शेवटी ब्लड रिपोर्ट आला.
पंचवीस गोळ्या गिळल्या
पस्तीस दिवसांनी.
वीस रुपयांच्या दहा फेऱ्या
आणि फक्त महिन्याच्या रजेत
मलेरिया गेला माझा
सध्या तरी !

—मा. तु. खैरेकर



# गाणे

बंजारा

वन तुटगो रें, जंगल तुटगो
घट तो समाज गान्यो जग उठगो ॥
जंगल न झाडोरी खुप व्हेगी हानी ।
करताजी धरतीप पडोकोणी पाणी ।
जमीमाई उष्णता खुप राटगो ॥ १ ॥
जंगले अभावी हवा माई व्हेगो जोर
कैंकेर वाळे मोई वडगेर घर
आदीवाशी मानवा चिंतामा पडगो ॥ २ ॥
शेतकरी शेतेमाई सदायेर वावडी
पडो कोणी पापी जना सुकी पाकी पडी
केर्ज लेवापी शेतकरी बुडगो ॥ ३ ॥
पेंजारे काकेमाई व्हेती जडी बुटी ।
आबर मकेनो एक लकडीरी खुंटी ।
स्वंपाक करेरो मस्कल व्होगो ॥ ४ ॥
गऊ धन लचमीरी खुब व्हेगी हाणी
खायन मळेनी उंदेन चारो पाणी ।
घी जांमणेरो तुटगाडो व्हेगो ॥ ५ ॥
झाडा पेंडोरो नाश व्हेगो खूप
करताणी जमीमांई वाडे लागी धूप
भू संकलनेगे जोर वाडगो ॥ ६ ॥
मानो मानो मानवा लगांवा जंगल ।
पान फुल फळ मळ जाव बखळ ।
मानवोरे मानवा आवतारी जागो ॥ ७ ॥

—सीताराम पवार

# हाक नावा केंजा

जय बूळ हालता जय पेरसाता साथ निकू तावा
गोंडपाणाता तिरकामटाता समजा निया बाणा ॥ध्रु०॥
मावा समाज अडाणी मंता
दुनियाता हिले तानू गंता
डाका डाफाते कय कपदूने पयसी मुने दायना ॥ १ ॥
बिना करियसी निमा मती
इतिहास खोवेनिया किती
आयमा आळसी मनमा अडाणी समाज नेंड तेहाना ॥२॥
ढूटी लंगोटीता निया साथी
गेळा गुट्टा इदे निया खेती
वासी मुनेरा किसी खेती रा पंडहा निमा सोना ॥३॥
जगमेंडू बदनाम निमाआती
जिंदगीता बारबाद निया किती
साथ हियाला कयदे तिरकामटा दिल ते लिंगोणा बाणा

—संजय पांडुरंग टेकाम

मराठीत अर्थ—

तुला साथ देणाऱ्या बुळहाल पेरसा या सर्व देवांचा जयजयकार असो. तू गोंडपाणा व तिरकामटा स्वतःचा बाणा समज.

आपला समाज अशिक्षित व भोळा आहे. त्याला या बदलत्या जगाची कल्पना नाही. तरी या जगाच्या पावलावर पाऊल ठेवून त्याच्या सहकार्याने तू पुढे जा.

तू अशिक्षित राहिला त्यामुळेच तू तुझा गौरवशाली इतिहास गमविलास तरी तू आता असा आळशी व अडाणी न राहता तुझ्या समाजाला पुढे आणून जगाची ओळख दे.

तू अजूनही मागासलेपणा दाखवितोस ढुटी लंगोटीचीच तू साथ करतोस. जंगलसंपत्तीलाच वडिलोपार्जित शेती समजतोस असा न राहता पुढे ये व स्वकष्टाने तू शेतात सोने पिकव.

साऱ्या विश्वात तू बदनाम झालेला आहेस व स्वतःचे जीवन खराब केलेला आहेस. तरी तू माझा साथ द्यायला अंतःकरणात लिंगो दैवताचा अभिमान बाळगून व बाण, भाता हातात घेऊन ये.

## वन विकास महामंडळ,
## नाशिक प्रदेश आदिवासी बांधवांकरिता काय करते ?

१. रोपवनाच्या निर्मितिद्वारा लाकूड उत्पादनांत भर घालणे.

२. आश्रमशाळांना सरपण व घरगुती उपयोगाकरिता फाटे व सरपण सवलतीच्या दरांत पुरविणे.

३. स्थानिक बुरुडांना व शेतकऱ्यांना बांबू सवलतीच्या दरांत देणे.

४. वाढत्या प्रजेच्या गरजा लक्षांत घेऊन त्यांच्या परिसरातच मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देणे.

५. वनविकास महामंडळात रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांना कायम स्वरूपी नोकरीत अग्रक्रमाने भरती करणे.

६. जंगल कामगार सहकारी संस्थांना कुप तोडीची कामे सुपूर्त करणे व या कामाच्या खर्चाव्यतिरिक्त २५ टक्के नफा देणे.

७. रोपवनांमधून गुरांकरिता गवत मोफत कापून नेण्याची व खुल्या भागांत वनचराईची सुविधा.

८. दुर्गम आदिवासी भागांत दळणवळणाची सोय करणे.

९. वनविकास महामंडळात व तसेच जंगल कामगार सहकारी संस्थांत काम करणाऱ्या मजुरांकरिता विश्व खाद्य प्रकल्पाच्या सौजन्याने "कामापोटी अन्नधान्य" या योजनेखाली गहू व तेल यांचा पुरवठा करणे.

१०. आदिवासी बांधवांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्याकरिता विविध कल्याणकारी योजना राबविणे.

# जंगलातले दहा दिवस



पुरुषोत्तम शेठ

अथांग पसरलेला शिवसागर! या शिवसागराच्या अथांग प्रवाहावरून 'वनराणी' ही लाँच डुलत चालली आहे. ही 'वनराणी' वासोटा किल्ल्याच्या घनदाट जंगलाच्या परिसराच्या काठावर उभी राहते, पटपट साठ तरुण, पस्तीस तरुणी बाहेर पडतात. प्रत्येकाच्या खांद्यावर असतो एक टिकाव! कोणी घेतो फावडे आणि या मुलांच्या मागोमाग चालू लागतात खाकी पोशाखातील वनाधिकारी! सातारा वन-खात्याने टाकलेल्या तंबूच्या समोर अनौपचारिक वातावरणात एक सभा होते. प्राचार्य वाळके हे वन-अधिकाऱ्यांचे स्वागत करतात. उमदे व हसरे वन-विभाग अधिकारी–विश्वासराव वाळके उद्घाटनाचा नारळ वाढवितात! हे कसले उद्घाटन! साधारणत: वनखात्याच्या अधिकाऱ्याला पावसाळ्यातच निमंत्रण असते. हे उद्घाटन नसून एका प्रयोगाचा शुभारंभ असतो.

सातारा वन-विभागाने या वर्षी नवीन उपक्रम आखलेला असतो. केवळ झाडे लावून हा वनविभाग आकडेवारीत समाधान मानीत नाही. लोकांमध्ये वृक्षसंवर्धनाची आवड निर्माण व्हावी व तरुण पिढीही जंगलमय व्हावी ही त्यांची तळमळ असते व यादृष्टीनेच विभागीय वन अधिकारी सातारच्या लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाला आवाहन करतात. एके दिवशी प्राचार्य वाळके, त्यांचे सहकारी व दैनिक ऐक्यचे संपादक शंकर सारडा यांना विभागीय वन अधिकारी वाळके, मोटे वासोटयाच्या जंगलात नेतात. वासोटा किल्ला ३८०० फूट उंचीचा आहे. दुर्लंगाठोक असे कडे आहेत. अस्वले सांबरे, रानरेडे, नीलगाईंनी भरलेले घनदाट जंगल आहे १२०० विविध प्रकारच्या वनस्पती आहेत. कदाचित सातारा जिल्ह्यातील नियोजित अभयारण्य येथेच होईल. त्यांच्या तळमळीचा नकळत परिणाम प्राध्यापकांवर होतो आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमशिबीर वासोटयाच्या जंगलात घेण्याचे ठरते व त्याच शिबीराचा, नारळ विभागीय वन अधिकाऱ्यांच्या हस्ते वाढविला जातो.

जानेवारीत विद्यार्थ्यांची पहिली तुकडी येते. आश्रम शाळेच्या बामणोलीच्या परिसरात पावसाळ्यात लावायच्या झाडासाठी एका दिवसात २×२ चे ७५ खड्डे खणले. संध्याकाळपर्यंत ६० विद्यार्थी व ३५ विद्यार्थिनी बामणोलीला जमतात. वासोटयाकडे कूच करतात.

वासोटयाच्या गार हवेत 'तुझ्या कामामधून, तुझ्या घामामधून उद्या पिकेल सोन्याचं रान' यासारखी गीते घुमू लागतात. टिकाव फावडयांचे संगीत तालसूर धरते. रेंज फॉरेस्ट ऑफिसर पडवळ, दळवी सूचना देतात. बघताबघता दगडसुद्धा शरण जातात. माती लोण्यासारखी मृदु होते. खडकांनाही हसू फुटते, दयाळ पक्षीही श्रमणाऱ्या लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करतो. पानोळ्या पाणी स्वच्छ करतात. लाल खारी आपल्या गुबगुबीत अंगानी या नवख्यांना स्वागताची ललकारी देतात. एखादे सांबरही कुतूहलाने पाहते. अस्वलाने रात्रीच येऊन रस्ता कसा काय झाला आहे याची चाचणी केलेली असते. कडे

येतात; परंतु माधार नाही. ही तरुण मुले-मुली भूक-तहान विसरतात. प्रत्येक गटात स्पर्धा सुरू होते आणि १० दिवसातच वासोटयाच्या जंगलात वासोटा किल्ल्याच्या पायथ्याला जाणारा २ कि. मी. चा रस्ता उभा राहतो. जुन्या पायऱ्या दुरुस्त होतात. २०० पायऱ्या नव्याने बांधल्या जातात.

### माडगूळकरांचे कथा कथन

या श्रमशिबीरात बौद्धिकेही जंगलाशी संबंधित असतात. एरवी व्यंकटेश माडगुळकरांचे कथाकथन एखाद्या बंद हॉलमध्ये होते; पण येथे इंदुली नदीच्या पात्रात दगडगोटयावर बसून जंगलाच्या जीवनाशी संबंधित मारुतीचे मंदीर ही कथा माडगुळकर सांगतात. रात्री ९ तारखेला शेकोटया पेटतात. पौर्णिमेचे टिपूर चांदणे वर असते. माडगूळकर जंगलचा कोष खुला करतात. वानरांचे सत्तांतर नाटयमय शब्दात सांगतात. हत्तीचे पारिवारीक जीवन खुलवून सांगतात. सिंहाचे आळशीपण नजरेस आणतात. सांबर, हरणांचे प्रणयाराधन प्रेमक्रीडा, शृंगारिक भाषेत सांगतात. वाघाचे एकाकी जीवन सांगतात. प्रश्नावर प्रश्न. दुसरे दिवशी माडगूळकरांबरोबर जंगलात फिरणे होते. इंदुली नदीच्या ओढयाच्या काठाने फिरतात. सांबराची लोळण्याची जागा दाखवतात. अस्वलाच्या झाडावरच्या नख्या दाखवितात. पानफुलांचे सौंदर्य समजावून देतात. मुले जंगलमय होतात.

खटावचे प्राध्यापक शिवशंकर उपासे चार भिंतीपेक्षा वासोटयाच्या जंगलाच्या खुल्या हवेत निसर्गकवी बालकवी ठोंबरे यांच्या कवितांचे रसग्रहण करतात. दुसऱ्या दिवशी कऱ्हाडचे प्राध्यापक के. डी. देशपांडे सुप्रसिद्ध शिकारी केनेथ अंडरसनच्या कथा सांगतात. या शिबीराचा समारोप जंगल वाचवा, सह्याद्री वाचवा. या परिषदेने होतो. जावळी भागातील जनप्रतिनिधी जिल्हा परिषदेचे सभापती गेनबा कदम प्रमुख पाहुणे असतात. या कार्यक्रमाला जंगल विभागातील १५सरपंच व सदस्य उपस्थित असतात. त्यांना जंगल हे त्यांच्या स्वतःच्या भल्याकरताच आहे. हे आवर्जून सांगितले जाते. परिषद ही जंगलमय होते.

१० दिवस जंगलातले पण रम्य आठवणीचे, हिरव्या पानाफुलांच्या सोबतीचे. जंगल खात्याचे अधिकारी एरवीचे लाल फितीचे संकेत बाजूला सारून कामाला उभे राहतात आणि त्यांच्या साथीला साथ म्हणून लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाचे तरुण विद्यार्थी, प्राध्यापकांच्या प्रेरणेखाली हातात हात घालून उभे राहतात तेव्हा जंगलात मंगल न होईल तरच नवल. जंगलखात्याने युवा शक्तीचा वनसंरक्षणासाठी आणि वनप्रेमासाठी सातारा जिल्ह्यात केलेला पहिला प्रयोग नांदीपाठ घालून गेला व प्रेरक ठरला......

□


# महंमद आणि पर्वत

'हाकारा'ची वार्षिक वर्गणी ऑक्टोबरच्या अंकाबरोबरच संपली. अनेकदा केवळ विस्मरणामुळे अथवा कामाच्या गडबडीमुळे नवीन वर्गणी पाठवायचे राहून जाते म्हणूनच आम्ही जुन्या सभासदांना त्या अंकाबरोबरच मनीऑर्डरचा फॉर्म भरून पाठविला होता. वर्गणीचे नूतनीकरण अद्याप बाकी आहे अशा वाचकांनी वर्गणी लवकर पाठवावी ही विनंती.

**हाकारा / परिषद यांची संयुक्त वार्षिक वर्गणी फक्त वीस रुपये**

**नवीन पत्ता** : द्वारा जगदीश गोडबोले, सीमा, ब–७, शिरोळे मार्ग, पुणे ४११ ००४

# ‘ अरण्येर अधिकार ’



## बीरसा मुंडाऱ्या जीवनावरची एक अनोखी कादंबरी

प्रभा तुळपुळे

‘ अरण्येर अधिकार ’ ही श्रीमती महाश्वेतादेवींची. कादंबरी बंगाली बीरसा मुंडाऱ्या जीवनाभोवती आणि त्यानें चालविलेल्या आंदोलनाभोवती गुंफलेली आहे. मुंडाऱ्यांच्या अंतरंगाचे वेधक दर्शन घडविणाऱ्या या कादंबरीची वानगी देण्याचा हा प्रयत्न.

छोटा–नागपूर भागात १९ व्या व २० व्या शतकांच्या संधीकाळात बीरसा मुंडाने बंड केले. मुंडांचा (एक आदिवासी जमाव) जंगलावर आणि जंगल जमिनीवर जन्मसिद्ध अधिकार आहे. जंगले आणि जमिनी कशा वापरायच्या ते आमचे आम्ही ठरवू असे त्याचे म्हणणे होते.

छुतीया आणि नागीया उर्फ छोटू आणि नागू या दोन बंधूंनी हा बिकट वनविभाग मानवस्तीस योग्य बनविला, तेथे मुंडारी जमात वसवली आणि म्हणून या भागाला छोटानागपूर असे नाव पडले असा त्या भागातील आजही सत्तर टक्के असणाऱ्या मुंडाचा विश्वास आहे. यात संशय नाही की ही जमात धाडसी होती, काटक होती. त्यांनी आपल्या समाजाला एक सुसंघटीत रूपही दिले होते. खुटकाटी व्यवस्था या नावाने ती अर्थरचना आजही ओळखली जाते.

बीरसाच्या काळी ही व्यवस्था मोडीत निघाली होती. मुंडाच्या खुटकाटी व्यवस्थेखाली असणाऱ्या जमिनी, कधी कर्जापोटी, कधी केवळ लांडीलबाडीने, व्यापारी, सावकार, अडते, यांनी हडपल्या होत्या. या साऱ्याच शोषकांना मुंडारी मंडळी सरसकट ‘ दिकू ’ म्हणून शिवी देत. दिकूंच्या जोडीने, सरकारने मुंडाचा पारंपारिक जंगलावरील हक्क, जंगलवनात नैसर्गिकरित्या उगवणाऱ्या अन्नावरचा, लाकडावरचा, पाल्यापाचोळ्यावरचा, पशूपक्षांच्या शिकारीवरचा हक्क नाहीसा करण्याची कारवाई केली होती. मुंडाची सारी अर्थव्यवस्थाच उन्मळून पडली होती.

आदिम अवस्थेतील समाजात धर्माचे स्थान आगळे असते. देवाच्या रूपाने सारी दुनिया जाणण्याची मूलभूत चौकट तो देतोच. सृष्टीची रहस्ये फार मोठ्या प्रमाणावर, त्यांच्या लेखी, अज्ञात असतात. या अज्ञाताला हा धर्म लपेटतोच; पण जेवढा काही इतिहास, भूगोल, शास्त्र ज्ञात असेल त्यालाही आपला दैवी स्पर्श करून वतो. आदिम समाजात धार्मिक कल्पनांनी घेरले नाही असे एखादेही अंग असत नाही, व्यवहार असत नाहीत. त्यांच्या व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय साऱ्या व्यवहारांचे नियंत्रण धर्म करीत असतो. साऱ्या त्यामुळे एक धार्मिक संकट आहे. प्रश्नांची उत्तरे धर्म देत असतो.

बीरसा मुंडाच्या कालचे मुंडा जमातीवरचे संकट असे मुंडाना वाटत आहे. मुंडा जमातीला नव्हे भारतातील साऱ्याच जनतेला त्याकाळी दुष्काळ, दैन्य, दरिद्र्य या गोष्टी नवीन नव्हत्या. उपासमारीने चकीत होण्यासारखे वा गोंधळण्यासारखे काही नव्हते. निसर्गाच्या नाना संकटाना तोंड देण्याची त्यांची स्वतःची सुघटीत पद्धत होती. महाश्वेतादेवींनी – या कादंबरीच्या लेखिकेने – वापरलेला शब्द वापरायचा तर ‘ कुमारी धरती ’च्या आणि कुंवार अरण्यांच्या सान्निध्यात रहाणारी ही माणसे. या निरक्षर समाजाचा सर्वांत प्रखर अनुभव, भावनोत्तेजक आणि विचारोत्तेजक एकमेव संपर्क, निस-

र्गाशी. कधी त्याच्या भव्यदिव्य कृपाळू रूपाशी तर कधी उग्र निष्ठूर विध्वंसक स्वरूपाशी. निसर्गाबरोबरच्या रोजच्या लढाईत पराभव झाला तरी तेजोभंग होत नसे. झाली तर आत्मविश्वासात, ज्ञानात थोडी वाढच होई.

पण आजच्या संकटाने त्यांना अगतिक वाटत होते, कुंठीत व्हायला झाले होते. दुर्दैव पाठीशी घेऊन गावोगाव भटकणाऱ्या सुगाना मुंडाला संभ्रम निर्माण झालाय तो शेते का पिकली नाहीत आणि वने का फळली नाहीत याचा नाही तर देव का बदलले, देवांचा देव 'सि-बोंगा 'सुद्धा पावत नाही कसा ? याचे कोडे त्याला छळतेय.

सुगाना हा बीरसाचा जन्मदाता, छोटू-नागूचा प्रत्यक्ष वंशधर. बीरसाची आई करमी. तिच्या पदरी पांच मुले. संसाराचा गाडा कसा हाकावा याच्या विचारात असणाऱ्या सुगानाच्या मनातले विचार टिपणारा हा उतारा.

'मी सुगाना मुंडा. फारा दिवसांपूर्वी म्हणे माझे पूर्वज छोटू आणि नागू येथे आले आणि या अनाघ्रात धरतीवर त्यांनी पहिला घाव घातला. या कुंवार वनाचे कुंवारपण संपवून मुंडाची वस्ती केली त्यांनी इथे. वाघ, डुकरे, लांडग्यांनी भरलेले हे जंगल, साल–गजार-पलस-कुसुम, पियाल, पियासाल, सिधा, शिवम झाडांचे हे रान, पोरक्याची धरती, तिच्या किंचित उचललेल्या वक्षासारख्या या छोटचा छोटचा टेकडचा. धरतीचे हे अप्रूप, हा अप्रूप देश. त्यांच्याच नावाने ना त्याला हे छोटे नागपूर नाव पडले !'

'या मुलुखाला ज्यांचे नाव, त्यांच्या वंशाचा माणूस असून मी–सुगाना मुंडा, आज भिकाऱ्यापेक्षा भिकारी. पोटात पेज नसते. अंगावरचा कपडा जरा आवळला की फाटतोय. किती वेळा मनात येते यापेक्षा चिडी पाखराच्या जन्माला येतो तर शेतातले दाणे टिपून जीव जगवला असता.'

'पूर्वजांची गोष्ट एवढी नाही रहात माझ्या मनाला लागून. माझ्याबरोबरचे सारेच मुंडा असेच रडतखडत जगताहेत न काय ? काय करणार आमच्या कपाळी ती 'सेंगल दा 'ची आग जळतेय ना. पार कधीच्या त्या आदि-युगात 'सेंगल दा 'च्या आगीने सारी पृथ्वी जळून राख झाली होती. सिं-बोंगा (देव) आकाशातून आग ओतत होता. त्यात सारी माणसे होरपळून मरत होती.'

'माहीत आहे ? फक्त एका खेकडयाच्या बीळात उरले होते थंड पाणी. जमिनीच्या गाभ्यातले थंडगार पाणी. एक पोरगा आणि एक पोरगी. तरणेबांड–मुंडा जातीचे होते ते. सालबनाच्या छायेला बसून पोरगा टूईला वाजवत होता. पोरगी नाचत होती. आग पाहिली आणि चमकून थांबले ते.'

'सिं-बोंगानी आकाशातून तोंड बाहेर काढले. म्हणाले, 'अरे पळा, पळा तुम्ही. तुमच्या डोक्यावर साऱ्या जनमा-मरणाचा भार, तुमच्या हातून पुन्हा जग उभे करायचेय मला.'

– ती दोघं म्हणाली 'पळू ? कुठे पळू आम्ही ?'

– ते ऽऽ तिकडे.

'आगीच्या रंगाचा साप. नागदेवता नागीरा, त्यानी आपल्या फणावर बसवले दोघांना आणि नेले त्याच त्या खेकडयाच्या बिळात थंड पाण्यात ती दोघे बुडून राहिली. झोपेत किती दिवस गेले ते त्यांचे त्यांना कळलेच नाही. सिं-बोंगाची हाक आली तेव्हा कुठे त्याना जाग आली.'

'बाहेर येऊन पाहतात तो सारखा पाऊस कोसळत होता कधीचा. सिं-बोंगानी जशी आग लोटली तसाच पाऊस पाडून सगळी आग थंड करून सोडली होती–केव्हापासून अरण्य, नदी, पहाड, पशू, पक्षी, फूल, फळ, कीडमुंगी सारे तयार करीत बसले होते सिं-बोंगा कोणजाणे.'

'ढगातून मान बाहेर काढून सिं-बोंगा ओरडून म्हणाले, 'जा जगात सगळे आहे. माणूस नाही. तुम्ही त्याला जन्म द्या. समजले? माणसामाणसांनी–काळ्याभोर मुंडा माणसानी जग कसे भरून गेले पाहिजे.'

'तो एक पोरगा आणि ती एक पोरगी त्यांच्यापासून सर्व मुंडाची, मुंडा जगाची सुरवात झाली.

'सेंगल दा ची ती आग, तीच आग सुगानाच्या कपाळ अजूनही जळतेय. कपाळी आग, पोटात आग, मनांत आग.'

'आजवर सारी आग त्याने स्वीकारली आहे. सारे काही त्याला कबूल आहे. कधी कशाची तक्रार नाही. याच्या मते एवढी थोरली आग, पटकन थोडीच विझायची आहे ती. मुंडाच्या आयुष्यातच आग पेटत असणारच.'

'आगीचे सुगानाला दुःख नाही. भरपेट खाल्ले, अंगभर नेसले, बंदोबस्तीने घरात झोपले की कसे वाटते ते त्याला मुळी कधी माहीतच झालेले नाही. अर्धपोटी राहून, चिंध्या पांघरून पडक्या घरात राहून त्याला वाईट वाटत नाही.

नव्हे, उलट सुगाना आणि करमी यासाठी देवाचे आभार मानतात. इतर अनेकांपेक्षा त्यांचे चांगले चाललेय.

सेवकपाट लिहून देऊन कोणाच्या जन्माला बांधले तर ते नाहीत! कोणा 'दिकू' कडे वेठबिगारी द्यायलाही ते बांधलेले नाहीत. खूप चांगले चाललेय त्यांचे.

— कोमता, बीरसा आणि कडेवरचा कनू तिघे पोरगे जवळ आहेत. दोघा पोरींची लग्ने झालीत.

— अडते तर सालोसाल येतात. चहाच्या मळचात काय केले की पैका फार असे सांगून भुलवून नेतात अनेक मुंडना पार कुठेतरी.

— सुगाना वगैरे तसे तर नाही गेले ना. खूपच चांगले चाललेय हो त्यांचे.

— उधार पाधार, कर्जबाजार, अभाव अनाहार, सुगानाच्या कल्पनेप्रमाणे याच या जगात त्याच्या वाटचाला येण्याजोग्या वस्तु. यापेक्षा वेगळ्या जगाची कल्पना त्याचे मन करू शकत नाही'

'बीरस का वेगळा उपजलाय?'

दुसरा उतारा आहे करमीच्या मनाचे चित्रण करणारा. कुठेतरी गुराख्याचे काम मिळण्याची शक्यता वाटतेय म्हणून मामाबरोबर ११ वर्षाचा कोमता आणि आठ वर्षाचा बीरसा यांना दूरच्या गावी पाठवायचे ठरतेय आणि आईबापांच्या मनात काहूर उठलेय.

'करमीचे आईचे अंतकरण सांगत होते आठ वर्षाच्या मुलाला पदराखाली झाकून ठेव. पण ती काही नुसती आई नाही, ती आहे मुंडा आई. मुंडा आई जाणते की आठ वर्षाचा मुलगा, गुराखी बनून म्हणा, वा कोण्या दिकूच्या कोठीत झाडलोट करून म्हणा पोटापुरती पेज कमावतो.'

'करमीचा बाबा दिबाई मुंडा. मोठा बहुश्रुत माणूस होता तो. त्याच्या तोंडून करमीने एकले होते की कोण्या एका काळी साऱ्या रानावनांत आणि डोंगरकपारीत बस्ती करीत होते फक्त मुंडा, ओराव, हो, कोल आणि संथाल त्या काळी मुंडा माता आपल्या मुलाला आताच्या दिकूंच्या मुलाप्रमाणेच अनेक दिवस आपल्या पदराखाली घालून ठेवी, ठेवू शकत असे.

फार फार वर्षापूर्वीची गोष्ट होती. पृथ्वी तेव्हा ऐवढी कठोर बनली नव्हती. सर्व काही होते. हरम आसूलाच्या हातात तो पोरगा आणि ती पोरगी जेव्हा खेकड्याच्या बीळात झोपले होते तेव्हा हरम आसूलानीच तर पाण्याचा वर्षाव करून पृथ्वीवरची आग विझवली.

सुरूवातीला जीव बनवला पाण्यातला. त्या जीवांना ते म्हणाले 'जा समुद्राच्या तळाची माती घेऊन या. जमिनीवरचे जीव बनवायचेत मला.'

समुद्र बसलाय त्यांना माती द्यायला! मासे तोंडात माती घेऊन वर जाऊ लागले की सागराची लाट येई आणि त्यांच्या तोंडातली माती काढून घेई. इकडे हरम आसूल तर सिंगभूम (प्रदेश) पेक्षाही मोठा आणि सपाट तळहात पसरूनच बसले होते केव्हाचे. माती मिळाली रे मिळाली की जमिनीवरचे जीव बनवणार.

शेवटी कासव वरती आले. पोटातली माती त्याने मला बरोबर बाहेर काढून दिली.

तेवढीशी ती माती. पण त्यातून हरम आसूलानी सारे काही तयार केले.

ते कसे सुखासमाधानाचे, सरळसोट जग होते. या दोघांना झाला एक मुलगा पण मुलगा तर रोगी, ज मरू घातलाय. ते आदि मुंडा जोडपे विचार करकरून थकले, लेकरू मरून गेले तर हरम आसूलाची मुण्डारी पृथ्वी. सि-बोंगाची मुंडारी धरती, काळ्याभोर माणसांनी कशी काय भरून काढायची?

हरम आसूलाच्या नावाने साद घालीत त्या आदि मातेने आकान्त केला. काळ्याशार कातळात कोरल्यासारख्या त्या चेहेऱ्यावरून हिऱ्यासारखे चमकदार अश्रू किती तरी वेळ वाहात राहिले.

हरम आसूल म्हणाले, 'बाबांनो सारी दुनिया बनवता बनवता थकलो म्हणून थोडी डुलकी घेत होतो. मला कशाला हाक मारलीत?

ती दोघ म्हणाली 'देवा, लेंकरू तर मरायला घातलय. तुम्हाला नाही तर कोणाला घालू साकडे?

— त्यात काय काळजीचे कारण? दरवाजाभोवती दारकशीला लागून कोळशाने चित्र काढ. चित्र पाहिल्याबरोबर रोग पळेल. माझी पूजा कर. पांढरी कोंबडी कापून पूजा दे.

— ती पूजा केली. तेव्हा लेकराला उतार पडला.

— कसे होते ते दिवस! किती थोडक्यात देव संतुष्ट होत! आज काल करमी वगैरे मधून मधून ख्रिश्चन बनतात. एकीकडे परंपरागत बोंगाबोंगीची पूजा चालू असतेच. पण रक्षणकर्ते बोंगाबोंगी आणि मुंडा माणसे यांच्यामध्ये आज अंतराय आलाय. मुंडा लोकांच्या मसणवटीतील कबरीवर मोठमोठे दगड असतात ना तसे मोठमोठे अडसर निर्माण झालेत दोघात. वैष्णव धर्म, संन्यासी धर्म, गोसावी धर्म, ख्रिश्चन धर्म, सदान

(हिंदु) धर्म, दिकू–कोर्ट–कचेरी–सावकार–कर्ज–वेठ–बिगारी–सेवकपाट–, दस्तखत, शेकडो मोठमोठे दगड एवढे दगड की ते बाजूला सारून बोंगाबोंगी मुंडाचे भले करू शकत नाहीत आता पूर्वी सारखे.

करमी उसासा टाकून म्हणाली 'करा काय ते, मला तर काहीच सुचेनासे झालेय. उपासाउपासाने डोके हलके झालेय, डोळ्यासमोर पिवळी फुले येताहेत, कपाळाला जणू मुंग्या आल्यात.'

करमीने अगतिकपणे बीरसाला घराबाहेर लाऊन दिले. पण बीरसाला नव्या जगाची वाट त्यातून मिळाली.

□



मॅगसेसे पारितोषिकाचे मानकरी

# मणिभाई देसाई

**पुण्यानजीकच्या उरुळीकांचन येथील सामाजिक कार्यकर्ते मणिभाई भीमभाई देसाई यांना त्यांनी ग्रामीण भागातील गरिबांच्या विकासासाठी केलेल्या कार्याबद्दल १९८२ चे मॅगसेसे पारितोषिक देण्यात आले आहे.**

खेड्यातील गरिबांच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी कार्य करण्याची शपथ श्री. मणिभाई यांनी महात्मा गांधींसमोर घेतली होती. ती पूर्ण केली म्हणून श्री. देसाई यांना हे पारितोषिक देण्यात आले आहे.

श्री. देसाई यांनी १९४० मध्ये स्वातंत्र्यसंग्रामात प्रवेश केला व ते महात्मा गांधींचे अनुयायी झाले. त्यांनी १९६७ मध्ये भारतीय कृषि औद्योगिक प्रतिष्ठान स्थापन केले व त्यामार्फत हजारो ग्रामीण लोकांना मदत केली.

डेन्मार्क व कॅनडाच्या सहकार्याने हे प्रतिष्ठान लवकरच गोपालन कृत्रिम गर्भधारणा व वनविकासाचे केन्द्रच बनले.

या केन्द्राच्या परिसरात दरवर्षी पायाच्या व तोंडाच्या रोगाने हजारो गुरे मरत. त्याला या केन्द्राने रोगप्रतिबंधक लस टोचण्याची मोहीम हाती घेऊन आळा घातला. स्वतः श्री. देसाई यांनी ४०० पेक्षा अधिक मेलेल्या गाईंचे शवविच्छेदन करून पशुवैद्यकीय शास्त्राचा अभ्यास केला.

या प्रतिष्ठानाने सामाजिक वनीकरणाचा मोठा कार्यक्रम हाती घेऊन ५०० एकर खडकाळ व ओसाड जमिनीचे रूपांतर हिरव्या पट्टयात केले.

श्री. देसाई हे १९४७ पासून उरुळीकांचन येथील निसर्गोपचार आश्रम व शाळा यांचे काम पहात आहेत. भारतीय कृषि-उद्योग प्रतिष्ठान या संस्थेवाटे शेती व पशुसंवर्धन यासाठी व्यापक स्वरूपाचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला. त्यांच्या कार्यक्रमातून कृत्रिम रेतन पद्धतीने वाढविलेल्या साडेआठ लाख संकरित गाई देशाच्या वेगवेगळ्या भागात आहेत.

संकरित गाय ज्याप्रमाणे श्री. देसाई यांनी लोकप्रिय केली त्याचप्रमाणे सध्या सर्वत्र प्रसिद्ध असलेले 'सुबाभूळ' लोकप्रिय करण्याचे कामही त्यांनीच केले आहे. उरुळीकांचन तसेच वाघोली येथे ओसाड माळरान असणाऱ्या जागी 'सुबाभूळ' वृक्षांचे घनदाट जंगल उभे आहे. जनावरांच्या 'लाळ्या' आणि 'खुरकुत' रोगांवरील लशीचे उत्पादन वाघोली येथे मोठ्या प्रमाणावर केले जाते.

# माडियांच्या विवाहप्रसंगातील कलात्मक मुंडी


गोविंद लांबे

माडिया ही आदिवासी जमात चंद्रपूर जिल्ह्यात फार मोठ्या प्रमाणात राहात आहे. सिरोंचा, गडचिरोलीच्या आसपासच्या जंगलातून छोट्या-छोट्या खेड्यामधून राहणारा आदिवासी आपला भिन्नत्वाचा विशिष्ट असा एक ठसा उमटवितांना दिसतो. सर्वसाधारणपणे शहरी किंवा नागरी लोकांपेक्षा प्रत्येक बाबतीत आपला वेगळेपणा हा माडिया दर्शवित असतो. समाजव्यवस्था, घरे व घरांची रचना, विवाहपद्धती, नृत्य, खानपान वा आदरतिथ्य असो, हा माडिया स्वतःच्या एका धुंदीत, बेहोष होऊन नाचणारा, आहे त्या परिस्थितीत आनंद मानून, दाट जंगलात लंगोटी घालून, खांद्यावर कुऱ्हाड घेऊन मनसोक्त हुंदडताना ह्या माडियांचा इतरांपेक्षा जाणवणारा वेगळेपणा दृष्टोत्पत्तीस येतो.

आपल्या अंगी असलेल्या विविध कला यात विशेषतः नृत्यकला, चित्रकला, कोरीव काम, वास्तुकला, लाकडावरील नक्षीकाम यातही मोठ्या चोखंदळपणाने लक्ष घालतो. माडियाची विवाहपद्धती वैशिष्टचपूर्ण आहे. वधूवरांना आपला जोडीदार निवडण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य देऊनच ते थांबत नाहीत. तर अगदी मनमोकळ्या वातावरणात हा विवाहसमारंभ साजरा करतात. ह्या समारंभामधून त्यांच्या परंपरागत चालिरीती विशेषत्वाने आढळून येतात. ह्या चालीरितीचा आढावा घेताना एक वेगळीच अनुभूती होत असते. विशेषतः गडचिरोली (जि. चंद्रपूर) ह्या भागातील माडियांच्या खेडेगावातून फिरताना त्यांच्या विवाहप्रसंगी मंडपात ज्याचे अतिशय महत्त्व असते अशा खांबाची माहिती मिळाली आणि एका वेगळ्याच दालनात प्रवेश केल्याचे समाधान झाले. प्रत्येक माडियाच्या घरासमोर दिसणारा सुंदर लाकडी कोरीव खांब पाहिला व माडियाविषयींच्या कुतुहलाची जागा कौतुकाने घेतली. याविषयी अधिक विचारणा केली असता या खांबाला विवाहप्रसंगी व त्यानंतरसुद्धा अतिशय महत्त्व असते असे समजले. या खांबास माडिया 'मुंडी' असे म्हणतात प्रत्येक घरातून अशा मुंड्या दिसून येतात. प्रत्येक मुंडी आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीत त्यांच्या कलाजाणीवेची साक्ष देत उभी आहे असे वाटते.

## माडियांची कलाशक्ती

'मुंडी' ही लग्नसमारंभात वधू-वराइतकीच महत्व-पूर्ण अशी बाब आहे. ही मुंडी मोहई, साग, सालई ह्या लाकडाची असते. हे लाकूड जंगलात तोडताना त्यावर



परशुने एक उभा व एक आडवा असे दोन घाव करण्यात येतात. असे करताना त्या झाडाचे साल खाली पडले तर त्या वधूवरांना पुढे मुलगी होणार व झाडाला साल चिकटून राहिले तर मुलगा होणार असे गृहीत धरले जाते. ह्या प्रकारानंतर वाजतगाजत ते लाकूड बंडीवर अथवा खांद्यावर टाकून गावात आणले जाते. अशा वेळेस गावातील मुली त्यांना वेशीवरच अडवितात व त्यांच्या पायावर पाणी टाकून टिळा वगैरे लावतात, व त्या मंडळींच्या खिशात असलेले सर्व पैसे काढून घेतात किंवा त्यांच्याकडून पैशाची मागणी करतात. व त्याने पैसे दिल्यासच त्याला गावात प्रवेश दिला जातो. हे (ओंडके) लाकूड माडिया जमातीतीलच कारागीराच्या हाताने सुबक कसे होईल याची काळजी घेतली जाते. यातून परंपरेबरोबर माडियांची कलाशक्ती प्रकर्षाने जाणवते. एक मुंडी दुसऱ्या मुंडीपेक्षा वेगळी आणि सुंदर कशी दिसेल याची स्पर्धाच लागलेली दिसून येते. एका लग्नसमारंभामधून एकाच मुंडीचा उपयोग केला जातो.

ही मुंडी पाच ते साडेपाच फूट उंचीची असते व तिची ५ ते ६ टप्प्यात विभागणी करण्यात येते. चौकोनी आकाराची ही मुंडी जमिनीत बऱ्याच खोलवर गाडली जाते. मुंडीवर विविध प्रकारचे नक्षीकाम कोरण्यात येते. या मुंडीवर त्यांच्या कुलदैवताप्रमाणे त्यावर चिन्ह कोरण्यात येत असते. निसर्गात दिसणारे पशु, पक्षी, प्राणी, झाडे, फळे, फुले एवढेच कोरून त्यांचे समाधान होत नसते तर श्रद्धेने नाग वगैरेसुद्धा काढले जातात.

## विविध चित्रे

गडचिरोली परिसरातील काही माडिया खेड्याचा विभाग पाहिल्यानंतर ह्या मुंडीवर मोर, पोपट, बदक, हरिण, उंट, अस्वल, मासोळी, सर्प, कासव, पाल, नारळ, कमळ निरनिराळ्या प्रकारची झाडे, भाला, इ. प्रकार दिसून आलेत. कारागीराला वाटेल तसे व वाटेल त्या स्वरूपात अशा प्रकारची चित्रे काढण्याचा आदेश दिला जातो.


जंगलात वावरणारा हा आदिवासी आपल्याजवळ काहीतरी शस्त्र बाळगून असतो. व त्यामुळे प्रत्येक मुंडीवर परशू व बंदूक दिसून येतेच. मुंडीवरील नक्षीकाम पूर्ण झाल्यानंतर बंदूकीमध्ये बार भरून व त्या बाराचा आवाज काढूनच मुंडी जमिनीत गाडली जाते.

## चंद्र आणि सूर्य


माडिया जमात चांद्रवंशीय असावी काय ? अथवा सूर्यवंशीय असावी काय? असा आपल्यासमोर प्रश्न उभा राहातो. प्रत्येक मुंड्यावर पूर्वेकडील बाजूला सूर्य व पश्चिमेकडील बाजूला चंद्र हा कोरलाच जावा असे त्या कारागिरावर बंधन असते. याशिवाय या मुंडीवर षटकोनी, चौकोनी, त्रिकोणी व बऱ्याच ठिकाणी वर्तुळातील नक्षीकाम दिसून येते. शिवाय त्यात दरवाजाच्या आकाराच्या कमानीसुद्धा कोरल्या जातात. मुंडीवर लग्न होणाऱ्या वराचे नावसुद्धा कोरले जात असते.

विवाह हा मुलाच्या घरीच होत असतो. मुलीला हुंडा पैशाच्या अथवा धान्याच्या स्वरूपात देण्याची प्रथा आहे. ह्या मुंडीचे जतन करून ठेवण्याची पद्धत यांच्यात दिसून येते. ती स्वतःहून कुजून खराब होत नाही तोपर्यंत ती मुंडी काढण्यात येत नाही. तर ती आपोआपच खाली पडते.

'मुंडी' ही माडियाच्या विवाहप्रसंगी त्यांच्या कलात्मकतेचे तसेच मानसिक प्रवृतीचे प्रतिकात्मक स्वरूप आहे. ही मुंडी तशीच ठेवण्यामागे माडिया आपल्या विवाहप्रसंगाच्या मधूर स्मृतीच जतन करीत असावा. वधूवरांना त्याच्या गोड आठवणींची सतत जाणीव होत असावी. म्हणून ही मुंडी आपोआप खाली पडेपर्यंत उभीच असते. मुंडीवरील पारंपरिकते सोबतच गृहस्थाश्रमात प्रवेश करताना ते कलेचे महत्त्व ओळखून आहे, हा यासंबंधीचा पुरावाच होय. असे म्हणता येईल. याप्रसंगी निरीक्षण केले असता कुठल्याही माडियाच्या घरासमोरील मंडपात तीन किंवा चारपेक्षा जास्त 'मुंड्या' आढळल्या नाहीत. एकत्र कुटुंबपद्धती असणाऱ्या माडियांच्या घरात खरे तर मुंड्यांची ओळच दिसायला हवी होती. कदाचित त्यांच्या संयमी जीवनाचा पुरावा म्हणून तर अशा प्रकारे त्यांच्यात कमी कुटुंबवृद्धी व त्यामुळे कमी विवाह होत असावेत.



# म्हणींमधून दिसणारे गोंडी लोकजीवन



भुजंग मेश्राम

समाजजीवनामध्ये संपर्काचे व संदेशवहनाचे प्रमुख साधन म्हणून भाषेला एक वेगळे महत्त्व आहे. त्यामुळे ती सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवहारातील एक प्रमुख प्रक्रिया बनते. जेव्हा सांस्कृतिक–सामाजिक अभ्यासाच्या दृष्टीने भाषेचा अभ्यास होणे आवश्यक आहे असे सामाजिक भाषाविज्ञानाचे तज्ज्ञ बोलू लागतात त्या वेळी खरोखर आदिवासी भाषा आणि बोलीच्या संदर्भात विचार करण्याची पाळी येते.

शतकानुशतके अंधारात खितपत पडलेल्या आदिवासींचे साधे चित्रणही इथल्या साहित्यात दिसत नाही आणि समाजशास्त्रासारख्या विषयात ते चित्रण मर्यादेने दिसते. शिवाय तेही अन्वयर्थांच्या कोंडीत !

आदिवासींच्या संस्कृतीचे आणि पर्यायाने कला-साहित्याचे मूळ स्वरूप शोधायचे असेल तर रूढीतील लोककथा, गीते, म्हणी आणि वाक्प्रचारासारखी साधने विचारात घेतल्याशिवाय चालत नाही.

गोंड जमातीतील रुढी त्यांच्या देवदेवतांची लोकगीते आणि कथांत दिसतात, तर त्यांच्या लोकजीवनातील नैतिक नियमांचे आणि कल्पनांचे स्वरूप वाक्प्रचार–म्हणींमधून दिसून येते.

## धार्मिक, सामाजिक प्रवृत्ती

आपण भौगोलिक अभ्यासाच्या दृष्टीने आंध्रातील उटनूर, बोथ तालुक्यातील तसेच महाराष्ट्रातल्या किनवट, वणी तालुक्यातल्या म्हणी पाहू या. आंध्र सरहद्दीवरील गोंडांमध्ये ह्या म्हणी नेहमीच व्यवहारात वापरताना आढळून येतात. ह्या म्हणींमधून कधी त्यांच्या धार्मिक तर कधी सामाजिक प्रवृत्ति स्पष्ट होतात, तर कधी जीवनाकडे पाहण्याचे त्यांचे दृष्टिकोन दिसून येतात. अशीच एक म्हण उटनूर तालुक्यातील गोंड जमातीत आढळन येते.

'कयदा तुडांता, तोडदा तुडांता.'

ह्याचा अर्थ असा आहे — 'हातांनी मारलं तर ते उडून जाते मात्र शब्दांनी मारलं तर ते चिकटून राहते.' हातांनी मारणे आणि तोंडाने मारणे ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. 'शहाण्या माणसाला शब्दांचा मार' म्हणतात, तसलाच हा प्रकार आहे. गोंडांच्या सामाजिक आणि व्यावहारिक जीवनातील मवाळपण आपण लक्षात घेतले तर ही म्हण अधिक स्पष्ट होऊ शकेल. गोंड लोक व्यावहारिक जीवनात मागासलेले असा सूरही त्यामुळेच निघत असावा. त्याची कारणे अनेक आहेत. ती कारणमीमांसा करण्याचे इथे प्रयोजन नाही. त्यांच्या व्यावहारिक जीवनातील संथपणा आणि एकलकोंडेपणा सगळीकडेच दिसून येतो. हे लोक सर्वसाधारण जास्त बोलके नसतात असे संपर्कातल्या बहुजन समाजाला वाटते. ते वाटणे साहजिकही आहे. कारण हे लोक मुळातच भोळे–भाबडे, देवदेवतांच्या आदिम कल्पनेत गुरफटलेले आहेत. त्यांच्या नीतिमत्तेच्या कल्पनाही पाप-पुण्याच्या कल्पनेपेक्षा वेगळ्या आहेत. म्हणूनच शब्दांनी मारलं तर ते मनात घर करून राहते हे त्यांच्या लोकजीवनाच्या व्यवहारातून स्पष्ट होते. इथे ही म्हण जवळपास 'शहाण्याला शब्दांचा मार' ह्या मराठी म्हणीशी थोड्या फरकाने सारखी वाटते. मराठी म्हणीत फक्त शब्दांनी मारण्याबद्दल सांगितले

आहे, तर गोंडीत हातांच्या आणि शब्दांच्या माराचा फरक सांगून सत्य सांगितले आहे हे त्याचे वेगळेपण आहे. म्हणून गोंडीतली म्हण ही मराठीच्या म्हणीपेक्षा निराळी व मूळ वाटते. शक्यता आहे, अशाच सारखेपणामुळे लोकसाहित्य-संशोधकाचे वेगळे मत बनले असावे.

श्रीमती दुर्गा भागवत म्हणतात, 'आदिवासींच्या लोकसाहित्यात कथा, गीते, उखाणे असले तरी म्हणींचा भरणा उसना असतो,' (लोकसाहित्याची रूपरेषा - दुर्गा भागवत, पृ. २९२) उलट मुळात खोल जाऊन आणि वेगवेगळया भागांतील त्याच जमातीमध्ये आपण ह्याचा अभ्यास केला तर वरील मत अप्रस्तुत वाटावे असेच आहे. आदिवासींच्या म्हणी जर आपण उसन्या म्हणू लागलो तर अजूनही इतर समाजांच्या संपर्कात न आलेल्या अरण्यात राहणाऱ्या गोंडांमध्ये ह्या म्हणी दिसल्या नसत्या. तर त्या दिसल्या असत्या फक्त बहुजन समाजाशी संबंध आलेल्या गोंडांमध्ये आणि तेही त्याचे मराठीकरण होऊन. एक गोष्ट खरी आहे, इतर समाजातील लोकांनी आदिवासींच्या प्रवृत्तीं पाहून त्यांना म्हणींतून नावे ठेवलेली आहेत. अहिराणीमध्ये भिल्लांच्या संदर्भात एक म्हण प्रसिद्ध आहे—

**' हांडी मा दाणा आन भिल्ल उताणा '**

ह्यातून भिल्ल जमातीच्या लोकांची प्रवृत्ती इतरांनी रूढ केली आहे. आपल्या घरातील मडक्यात चार दाणे आले म्हणजे भिल्ल आपला बिनधास्त असतो असा त्याचा अर्थ आहे. अशीच एक म्हण गोंडांमधील परधान ह्या शाखेविषयी आहे.

**' परधान फुस अन् गोष्टीले कुस.'**

परधान कल्पक बुद्धीचे म्हणन प्रसिद्ध आहेत. वास्तविक गोंडी दंतकथा, गीते ऐकवण्यामुळे इतरांनी 'फुस मारणारी जमात', असा अर्थ रूढ केला. परधान थापा मारण्यात अन् प्रत्येक गोष्टीला वळण देण्यात पटाईत असतात असा त्याचा अर्थ होतो. वास्तविक ह्या प्रवृत्तीचे सत्य न पाहता कुणीही त्यांना नावे ठेवलेली आहेत. **'अशानेच तर चांदा गेला!'** किंवा **'काय गोंड कोलाम समजलास काय?'** ह्या व्यवहारात बोलल्या जाणाऱ्या उपहासगर्भ वाक्यांवरून त्यांना गोष्टींतून किती नीच समजले जाते ह्याचाच हा प्रत्यय आहे. खरे तर, 'गोंड' किंवा 'परधान' ही दोन्हीही जातनामे मूळ भाषेतील नाहीत. मूळ भाषेत 'कोया' हे नाव आहे. अशा नामांमुळे आदिवासींबद्दल अर्थ-अनर्थाचा सूर निघण्यास मदत झाली असावी. 'कुणी येवोनी जावो। टिकली मारोनी जावो।' ह्या पोरांच्या गीतासारखीच गत झाली. ह्याचा अर्थ 'फुस मारणे' ही पूर्णार्थाने सत्य असेलच असे नाही. कारण आदिवासींच्या मुकेपणाचा दुसऱ्यांनी घेतलेला हा फायदा आहे. अशाच प्रकारची एक म्हण गोंडीमध्ये प्रसिद्ध आहे.

**' कोयतो पंडतोर, ढम्का बोमतोर '**

ह्याचा अर्थ असा :— 'गोंड पिकला अन् त्याने ढमका विकला.' ढमका म्हणजे धान्य ठेवण्याची कणगी. ह्यातून गोंडाची एक प्रवृत्ती स्पष्ट होते. गोंडाला जास्त पीक पिकले तर तो इतका उदार होऊन जातो की, धान्य ठेवण्याची कणगीच देऊन टाकतो दुसऱ्याला! ह्याचा मूळ अर्थ असा, त्याला उत्पन्न, मिळकत अगर पीक जास्त झालं तर तो इतका आनंदित होतो की, बचतीची सगळीच साधने तो विकून अथवा दुसऱ्यांना देऊन टाकतो. ह्या म्हणीतून त्याच्या दोन प्रवृत्तींचे स्पष्टीकरण मिळते. एक भोळेपण आणि दुसरे उदारपण. ही त्यांची प्रवृत्ती सर्वमान्य आहे. त्यामुळे इतरांना त्यांच्या प्रवृत्तीचा फायदा पिळवणुकीसाठी होतो.

गोंडांच्या व्यावहारिक जीवनातली अशीच आणखी एक म्हण प्रसिद्ध आहे.

**हाट्टूम सोनवाना हूटूम काल।**
**रोन मनवाना फेरा छाल!**

अर्थ :— 'बाजारात जाणाऱ्याचा उंटासारखा पाय, घरी राहणाऱ्याचा दलदलीत पाय.'

हा अर्थ प्रतीकात्मक असा आहे. 'बाजार' हा शब्द व्यावहारिक जगात धडपडणाऱ्यांसाठी आलेला आहे. जे प्रयत्न करतात त्यांची झेप उंटासारखी असते. जे प्रयत्न करतच नाहीत त्यांचे पाय चिखलात असतात. ते आत्मविवंचनेच्या दलदलीत रुतलेले असतात. जगण्यासाठी उंटागत चालले पाहिजे हा सुप्त संदेशही ह्या म्हणीतून मिळतो. निसर्गाची पूजा करणाऱ्या गोंडांमध्ये भाबड्या आशावादाची किरणे उजळण्याचा हा प्रत्यय असावा हे ह्यातून स्पष्ट व्हावे.

उटनूर तालुक्याच्या गोंडात धार्मिक जीवनाशी संबंधित अशी एक म्हण आहे.

( पृष्ठ क्र. ३६ वर पहा)

# वननीति आणि वनसंवर्धन कृतिसत्र

बांद्रा (मुंबई) येथे झालेल्या जबरन जोत आंदोलन कृतिसमितीच्या बैठकीत सरकारची वननीति, लोकसभेपुढे असलेले वनविधेयक आणि सामाजिक वनीकरणाच्या योजना या विषयी सविस्तर चर्चा व्हावी म्हणून तीन दिवसांचे एक कृतिसत्र आदिवासी जाणीव जागृती केन्द्राने आयोजित करावे असे ठरले होते. त्याप्रमाणे केन्द्राच्या वतीने हे कृतिसत्र २, ३ व ४ मे १९८२ रोजी कशेळे ( ता. कर्जत जि. रायगड) येथील ॲकडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स च्या परिसरात आयोजित करण्यात आले.

*

कृतिसत्रामागचा उद्देश व पार्श्वभूमि स्पष्ट करतांना श्री. शरद कुलकर्णी आपल्या प्रास्ताविकात म्हणाले, '१९८१ च्या प्रारंभी भारत सरकारने वनविधेयकाचा मसुदा प्रसारित केला. त्यातील अनेक तरतुदी जंगल विभागात राहणाऱ्या आदिवासींना व अितरांना जाचक ठरणाऱ्या होत्या. या मसुद्यात लोकांचे जंगल-जमिनीवरील व जंगलमालावरील हक्क जवळजवळ संपुष्टात आणण्याचा प्रयत्न होता. सवकार कोणतीही जमीन जंगलजमीन म्हणून जाहीर करू शकेल अशी तरतूद होती. वॉरंटाशिवाय अटक करण्याचे अमर्याद अधिकार वनअधिकाऱ्यांना देण्यात आले होते. या सर्व गोष्टी जनतेच्या कल्याणासाठी वनरक्षकाच्या नावावर केल्या जात होत्या. हा मसुदा फार मर्यादित स्वरुपात व वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनाच दाखविण्यात आला. संसदेच्या अंदाजपत्रकी अधिवेशनात उद्घाटन करताना राष्ट्रपतींनी आपल्या अभिभाषणात या अधिवेशनात १९४७ चा वनकायदा रद्द करून त्या जागी नवीन कायदा आणण्यासाठी अेक विस्तृत वनविधेयक मांडले जाईल असे म्हटले आहे. या मसुद्याची सविस्तर चर्चा करणारा श्री. शरद कुलकर्णी यांचा लेख अिकॉनॉमिक ॲण्ड पोलिटिकल वीकलीने १६ जानेवारी १९८२ च्या अंकात प्रसिद्ध केला. महाराष्ट्र टाइम्सनेही श्री. कुलकर्णी यांचे 'जंगल चे रक्षण लोकांसाठी की लोकांपासून' या मथळ्याचे टिपण १५ फेब्रुवारी १९८२ च्या अंकात प्रसिद्ध केले.

ग्रामायनाचा वनसंवर्धनमेळावा, मनोर, शहादे व सिरोंचा येथील जंगलबचाव परिषदा यामध्ये या मसुद्यावर चर्चा झाली. महाराष्ट्र, गुजराथ, मध्यप्रदेश व राजस्थान या राज्यांतील कार्यकर्त्यांचा मेळावा अिंदूर येथे जानेवारीत आयोजित करण्यात आला. विविध राज्यातील जनजागरण गटांनी या प्रश्नावर बैठका व चर्चासत्रे आयोजित केली. आदिवासी जाणीव जागृती केन्द्र व दिल्लीतील अिंडियन सोशल अिन्स्टिटयूट, पीडित लोकायन वगैरे संस्थांच्यावतीने देशभरच्या जनजागरण गटांच्या कार्यकर्त्यांचा मेळावा अेप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात घेण्यात आला. या सर्व प्रतिक्रियांचा परिणाम म्हणून की काय सरकारने हा मसुदा संसदेच्या या अधिवेशनात मांडण्याचे टाळले. त्याऐवजी अेक नवीन सुधारित मसुदा संसदेच्यापुढे आणण्याचे ठरले आहे असे समजते. अशा रीतीने वनविधेयक मंजूर होण्याचे काही काळ टळले असले तरी ते कायमचे टळणे शक्य नाही. त्यामुळेच या विधेयकांच्या मुळाशी असणारी लोकविरोधी आणि अधिकारशाहीला धार्जिणी व्यापारी वननीति जनतेपुढे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

जंगलांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असल्याने जंगलावर अवलंबून असलेल्या लाखो गरिबांना जंगलमालाच्या वापरापासून वंचित करणारे हे वनविषयक धोरण बदलण्याची मागणी लोकांनी केली पाहिजे.

या प्रास्ताविकानंतर '**नवीन वननीति : निकड आणि स्वरूप**' या मथळ्याचे आपले टिपण श्री. कुलकर्णी यांनी कृतिसत्रात सादर केले. या कृतिसत्रासमोर सविस्तर चर्चेसाठी प्रामुख्याने पुढील मुद्दे ठेवण्यात आले.

१. सरकारची सध्याची वननीति

२. वनविधेयकाचा मसुदा

३. सामाजिक वनीकरणाच्या योजना

४. पर्यायी लोकाभिमुख वननीति

५. वनविधेयकाविरुद्ध संयुक्त कृती

कृतिसत्रामध्ये या प्रमुख मुद्यांवर झालेल्या सविस्तर चर्चेचा गोषवारा पुढील प्रमाणे --

अपेक्षित वननीतिसंबंधी कार्यकर्त्यांच्या सूचना : सरकारी वननीतीला विरोध करताना लोकांची अशी पर्यायी वननीति तयार करणे आवश्यक आहे या भूमिकेतून कार्यकर्त्यांना वननीतीसंबंधी सूचना मांडण्याचे आवाहन करण्यात आले. त्या अनुषंगाने झालेली चर्चा पुढीलप्रमाणे--

सरकारी वननीति हा सरकारच्या एकूणच विकासविषयक धोरणाचा एक भाग असल्याने हल्ला करावयाचाच तर तो सरकारच्या नागरी समाजाभिमुख अशा विकासनीतिवर केला पाहिजे. कागदासाठी बांबू तसेच कलाकुसरीच्या वस्तुंसाठी तसेच कोरीव कामासाठी लाकूड या प्रामुख्याने नागरी समाजाच्या गरजा आहेत. परंतु त्यांचा बोजा मात्र जंगलावर पर्यायाने जंगलवासी आदिवासींवर टाकण्यात येतो नागरी समाजाचे हितसंबंध राखू पाहणाऱ्या सरकारी विकासधोरणावर झोड उठविणे आवश्यक आहे.

वननीतिसंबंधीची भूमिका वनसंवर्धनाचीच असावी परंतु स्थानिक लोकांच्या गरजांना प्राधान्य दिले पाहिजे.

वननीति ठरविताना जंगलजमीन लोकसंख्या प्रमाण लक्षात घेणे आवश्यक आहे. स्थानिक जनतेच्या गरजा जेमतेम भागतील अशी परिस्थिती असताना मोठ्या प्रमाणावर जंगलतोड शक्य नाही.

सरकारी वनीकरणाचा भर सागाच्या लागवडीवर आहे. सरकारच्या या व्यापारी धोरणावर टीका करण्यात आली.

वननीति ठरविताना पुढील सूचना विचारात घ्याव्यात :--

१. लोकांच्या किमान गरजा भागण्यासाठी किमान जंगल असावे.

२. बांबू, जळण, सरपण यासाठी तोड करण्याची मुभा लोकांना देण्यात येऊन इतर तोड बंद करावी.

३. सरसकट जंगलतोड होऊ नये.

४. शेतकऱ्याला उपयुक्त अशी झाडे लावण्यावर भर देण्यात यावा. उदा. असन--नांगरासाठी लाकूड मिळते. लागवडीनंतर ७--८ वर्षांनी उपयोग करता येतो.

५. ज्या ठिकाणी पडजमीनीवर झाड नाही तेथे लगतच्या जंगलात जळाऊ लाकूड देणाऱ्या झाडांची लागवड करावी.

६. तांत्रिक बाबींबरोबरच आदिवासींच्या जंगलाविषयीच्या भावनांचा, आत्मीयतेचा विचार झाला पाहिजे. आदिवासींना विश्वासात घेऊन जंगले वाढवावीत.

वनसंवर्धन योजना राबविताना कोणती झाडे लावावयाची ते सरकार ठरवील. या जंगलामध्ये प्रवेश करण्यास स्थानिक माणसाला मज्जाव केला जाईल. या सरकारी धोरणाविरुद्ध आवाज उठविणे आवश्यक आहे.

जंगलजमीन--लोकसंख्या प्रमाण विचारात घेऊन वनसंवर्धनाचे धोरण ठरवित असतानाच संवर्धनोत्तर उत्पन्नासंबंधी नीती ठरविणे आवश्यक आहे. संवर्धनोत्तर आदिवासींचे हक्क मान्य झाल्याशिवाय आदिवासींनी संवर्धनात सहभागी होण्यात अर्थ नाही. संवर्धनात सहभागी असलेल्यांना उत्पन्नाचा वाटा मिळालाच पाहिजे. वनसंवर्धन, वनशेती यामध्ये सहभागी होताना स्वामित्वाच्या हक्काचा विचार होणे आवश्यक आहे.

या चर्चेच्या अनुषंगाने पुढे आलेले मुद्दे तपशीलवार चर्चेसाठी विचारात घ्यावेत असे ठरविण्यात आले.

वननीति ठरविताना स्थानिक जनतेच्या गरजांना प्राधान्य दिले जावे. स्थानिक गरजा म्हणजे काय ? स्थानिक या शब्दाची व्याप्ती, स्थानिकतेचे क्षेत्र ठरविले जावे.

स्थानिक लोकांचे हक्क, जंगलाशी नाते--नाते म्हणजे नक्की काय ? हे स्पष्ट करावे, स्वामित्वाचे प्रकार-- १. सरकारी, २. सामुहिक, ३. खाजगी, ४. वहिवाट. स्वामित्वाच्या अटी स्पष्ट व्हाव्यात.

स्थानिक गरजांबरोबरच राष्ट्रीय गरजांचा विचार आवश्यक आहे.

गौण वनउपजांमध्ये (Minor Forest Produce) काय समाविष्ट असावे ? त्यावरील हक्क व त्यांचे स्वरूप.

लोकसंख्या--जंगलप्रमाण.

वनसंवर्धनाला अर्थपुरवठा कसा व्हावा ?

व्यापारीकरण.

सामाजिक वनीकरणाची ( Social Forestry ) कल्पना स्पष्ट व्हावी.

या प्रमुख मुद्द्यांच्या अनुषंगाने झालेली चर्चा पुढील-प्रमाणे—

## स्थानिक गरजा व स्थानिकतेची व्याप्ती

स्थानिक गरजांची व्याख्या करताना अगोदर क्षेत्र ठरविले गेले पाहिजे. ब्लॉक हे युनिट प्रमाण धरावे अशी सूचना पुढे आली; परंतु डोक्यावरून मोळी इ. ज्या अंतरावरून साधारणपणे आणली जाते तेवढ्या १०–१२ किलोमीटर अंतरातील परिसर ' स्थानिक क्षेत्र ' म्हणून प्रमाण मानण्यात यावा यावर एकमत झाले.

उपजीविका व उपभोग या स्थानिक जनतेच्या गरजा मानण्यात याव्यात. स्थानिक गरजांमध्ये कंदमुळे, पाला, गवत, घरांसाठी वासे, जळणासाठी लाकूड—फाटा, बांबू, शेतअवजारांसाठी लाकूड याचा समावेश करण्यात यावा. व्यापाऱ्यांना विकण्यासाठी लाकूड ही गरज मानण्यात येऊ नये. व्यापारी नफा हा गरजेत अंतर्भूत होत नाही. झाड न तोडता घेता येते तो ' गौण उपज ' उदा. मध, डिंक, पाने इ. गोळा करण्यास, नेण्यास बंदी नसावी. शेतकऱ्यांची व गावकऱ्यांची गरज ही स्थानिक गरज मानली गेली पाहिजे. व्यापारी व गावकऱ्यांच्या गरजांचा समावेश स्थानिक गरजांमध्ये होता कामा नये. व्यापारीकरणास आळा घालता येईल अथवा नाही याविषयी मतभेद आहेत. व्यापारीकरणाचे आक्रमण थांबवणे आवश्यक आहे. उपजीविकेची गरज गौण उपज विकूनच भागली गेली पाहिजे असा आग्रह धरणे आवश्यक आहे. स्वतःच्या उपयोगापलीकडे स्थानिक जनतेने झाडे तोडू नयेत. जळणासाठी फाटा गोळा करण्यास बंदी नसावी. उपजिविकेसाठी मोळ्या नेण्यास बंदी नसावी.

## काही तांत्रिक मुद्दे

वननीति ठरवितांना काही तांत्रिक मुद्द्यांचाही विचार आवश्यक आहे

(१) लाकूडफाटा गरिबांना सहज परवडतो, गॅस, बायोगॅस इ. साठी लागणाऱ्या साधनसामुग्रीचा खर्च गरीबांना न परवडणारा आहे. त्यामुळे जळणाबाबतच्या मर्यादा गरीब आदिवासींवर न घालता शहरी लोकांवर घालाव्या.

(२) खर्च, उत्पन्नाचा विचार करताना लोकांच्या हिताचा विचार केला पाहिजे. सरकारच्या उत्पन्नाच्या व्याख्येलाच आव्हान दिले जावे. खर्च—उत्पन्नाचे निश्चित धोरण ठरविणे निकडीचे आहे.

(३) लोकाभिमुख अशा वननीतिचे धोरण ठरविण्याच्या दृष्टीने उपयुक्त अशी तांत्रिक माहिती जमवून तिचा लोकांमध्ये प्रसार होणे आवश्यक आहे.

(४) ज्यामुळे तोड करावी लागत नाही, जंगलाची हानी होत नाही, वनसंवर्धनाच्या कामात अडथळा येत नाही ती गौणउपज अशी व्याख्या करावी. याउलट ज्यासाठी तोड करावी लागते व वनसंवर्धनात अडथळा येऊन जंगलाची हानी होते ती मुख्य वनउपज (Major Forest Produce) समजण्यात यावी.

## सामूहिक व्यवस्थापन

स्थानिक गरजा भागविणारे जंगल सामूहिक व्यवस्थापनाखाली असले पाहिजे यावर एकमत झाले. २० वर्षांपुरती सामूहिक व्यवस्थापनाची व्यवस्था करावी. सामूहिक व्यवस्थापन काही ठिकाणी अयशस्वी झाले असले तरी नोकरशाहीच्या व्यवस्थापनाला योग्य पर्याय शोधणे अतिशय निकडीचे आहे. त्या दृष्टीने पारंपारिक वनपंचायतीचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न करावेत. व्यवस्थापनाची पद्धत ठरविणे आवश्यक. तसेच खरेदी—विक्रीवर मर्यादा घालाव्या. स्थानिक गरजा भागणे ही पहिली अट असेल तरच सामूहिक व्यवस्थापनाला अर्थ आहे. सामूहिक व्यवस्थापन हीच आपली सामाजिक वनीकरणाची पूर्वअट असावी.

वननीति ठरविताना स्थानिक गरजांचा विचार करतानाच व्यापक राष्ट्रीय गरजा तसेच अस्थानिक लोकांच्या मूलभूत गरजांचाही विचार करावा लागेल.

लोकसंख्या ! जंगलजमीन हे प्रमाण तर विचारात घ्यावे लागेलच; परंतु यासंबंधी स्थानिक विशेषत्वाचा विचार करावा लागेल. त्यानुसार धोरणात फेरफार आवश्यक आहेत.

## पर्यावरणसंतुलनासाठी मर्यादित जंगलतोड

पर्यावरणसंतुलनाच्या दृष्टीने जंगलतोड ८–१० वर्षे पूर्णपणे थांबविली गेली पाहिजे असा विचार मांडण्यात आला. त्यासाठी जंगलतोडीवर पूर्ण बंदी घालण्याची टोकाची भूमिका घ्यावी असे सुचविले गेले. त्यावर

इतकी टोकाची भूमिका व्यवहार्य नाही. स्वतःच्या उपयोगापुरतीच झाडे तोडावीत, त्यापलीकडे तोडू नयेत— 'ज्यादा लगाव, कम तोडो' अशी संयमी भूमिका घ्यावी असे मत मांडले गेले.

## कार्यकर्त्यांच्या स्थानिक अडचणी

रविवार दि. ३ मे रोजी सकाळच्या दुसऱ्या सत्रात कार्यकर्त्यांना आपल्या स्थानिक अडचणी मांडण्याचे आवाहन करण्यात आले.

(१) सुरेखा दळवी, तारा प्रकल्प यांनी दळी जमिनीची समस्या मांडली. १९४५ नंतर कातकरी—ठाकूर यांना दळी पद्धतीने जमिनी कसण्यासाठी दिल्या होत्या. त्यामुळे काही आदिवासी स्थायिक झाले परंतु अलिकडे दळी जमिनीसंबंधीची खातेपुस्तके आदिवासींकडून सरकारी अधिकाऱ्यांनी काढून घेतली. अधिक चौकशी केल्यास सरकारी अधिकारी टोलवाटोलवी करतात. दळी जमिनीत वरकस पिके, वरी, नाचणी काढावीत, भातशेती करू नये असे सांगण्यात येते. खातेपुस्तिका काढून घेतल्याने मूळ करार काय होता हे समजणे कठीण आहे अशी तक्रार त्यांनी केली. याच पद्धतीच्या एक साली पट्टीने दिल्या जाणाऱ्या जमिनीसंबंधी उल्लेख असलेले ताम्रपत्र भोर संस्थानात उपलब्ध असल्याची माहिती मुळशी भागात काम करणारे श्री. सुलाणी यांनी दिली.

(२) धुळे जिल्ह्यात शहादा भागात आदिवासींमध्ये काम करणारे उल्हास राजज्ञ यांनी पुढील अडचणी मांडल्या. १) आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्थेच्या पीतपुस्तिकेत अनेक त्रूटी आहेत. २) डिंक गोळा करणाऱ्यांनाही मारहाण होते. ६ इंचापेक्षा अधिक घेराची लाकडे जप्त केली जातात. ३) दंडाची पावती देण्यात येत नाही. ४) जंगलभागात वसलेल्या खेड्यांना नोटिस देऊन ताबडतोब ६ महिन्याच्या आत गाव उठविण्यास सांगितले गेले आहे. यावर कोर्टातून स्थगित घेता येईल असे सुचविण्यात आले. वनअधिकाऱ्याचे हक्क व अधिकार यांची संपूर्ण अधिकृत माहिती जमविण्याचे ठरले.

(३) Agrisilviculture योजनेखाली सरकारकडून रोपे घेऊन ती लावण्यासाठी आदिवासींना जमीन दिली जाते. परंतु झाड वाढल्यावर मात्र ती सोडून जाण्यास सांगितले जाते. पर्यायी जमीन लांब अंतरावर देण्यात येते. तेथे जाण्यास आदिवासी नाखूष असतात. जमीन सोडून जाणे नाकारतात अशी माहिती पुढे आली. यावर ओरिसामध्ये Shifting Axe Cultivation ला पर्याय म्हणून सरकारने राबविलेली Agrisilviculture योजना यशस्वी झाली. तसेच या योजनेचा १०—१२ विविध राज्यांतील अभ्यास आपण केला असल्याचे श्री. दाते यांनी सांगितले.

१. दळी जमिन पद्धत—सरकारी आदेश २. Agrisilviculture योजना ३. निस्सार हक्क. यासंबंधी सविस्तर अधिकृत माहिती मिळविण्याचे ठरविण्यात आले.

## सामाजिक वनीकरण योजना
### ( Social Forestry Scheme )

३ मे रोजी दुपारच्या सत्रात सामाजिक वनीकरण योजनेवर सविस्तर चर्चा झाली. प्रथम सामाजिक वनीकरण म्हणजे काय हे स्पष्ट करण्यात येऊन सामाजिक वनीकरणाच्या प्रकल्पामध्ये प्रकल्पाच्या जागेची पाहणी, नर्सरीची स्थापना, हवामानात योग्य अशा वृक्षांच्या लागवडीत वाढ, बियाणांचा, रोपांचा पुरवठा, भूसंधारण उपाययोजना, वनसंवर्धनासंबंधी परिसंवाद, प्रसिद्धी, संशोधन, प्रशिक्षण इ. कार्यक्रमांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले. 'ग्रामीण भागातील गरीब व बेरोजगार व्यक्तींकडून वृक्षरहित वनांमध्ये वनरोपण', विद्यार्थ्यांसाठी 'एक मूल एक झाड' यासारख्या योजना वनीकरणामध्ये लोकांचा सहभाग मिळविण्यासाठी शासनातर्फे आखण्यात आल्या आहेत. सामाजिक वनीकरणाच्या कार्यक्रमात शासकीय विभाग, स्थानिक संस्था इतर संस्था आदींचे सहकार्य घेण्याचा शासनाचा विचार असल्याची माहिती देण्यात आली.

सामाजिक वनीकरणयोजनेवरील सविस्तर चर्चेत प्रामुख्याने पुढील मुद्दे आले. योजना कागदावर चांगली दिसत असली तरी त्याची अंमलबजावणी नीट होत नसल्याने लोकांमध्ये योजनेविषयी विश्वास निर्माण झालेला नाही.

वनसंवर्धनात सहभागी होणाऱ्यांना उत्पन्नाचा हिस्सा मिळण्यासंबंधीचा स्पष्ट खुलासा नसल्यामुळे लोकांनी ही योजना अंमलात आणली नाही.

लोकांना नुसती रोपे पुरवून काम होणार नाही तर त्यासाठी वनसंवर्धनाचे तांत्रिक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. रोपांबरोबरच कुंपण, राखणी यांचाही खर्च सरकारने दिला पाहिजे.

संघटनांनी सामाजिक वनीकरणाचे प्रयोग हाती घ्यावेत. योग्य त्या तांत्रिक प्रशिक्षणाची व्यवस्था श्री. बाबा आमटे यांच्या सहकार्याने अशोकवन, नागपूर येथे करता येणे शक्य आहे अशी माहिती श्री. दाते यांनी दिली.

सिंचनसोयींनी युक्त वनशेतीचे प्रयोग संघटनांनी सुरू करावेत. अशोकवन, नागपूर येथे श्री. दाते यांनी तसेच ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्सच्या वतीने श्री. दर्शन शंकर व जनसेवामंडळ, नंदुरबार यांच्या-वतीने श्री. जेम्स मस्कान्हनेस यांनी अशा प्रकारच्या प्रयोगास आपली तयारी असल्याचे सांगितले.

श्री. जगदीश गोडबोले यांनी डेहराडून येथील फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिटयूटकडे वनीकरणाच्या योजना गटांनी पाठविल्यास त्यास सहाय्य करण्याची इन्स्टि-टयूटची तयारी असल्याची माहिती दिली. याचा फायदा घेऊन श्री. उल्हास राजज्ञ, श्री. सिताराम पवार, श्री. मुलाणी, श्री. मोरू वळवी व श्री. कुन्हाडे हे आपापल्या गटातर्फे अशा प्रकारच्या योजना फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिटयूटकडे सादर करण्यास तयार आहेत. त्यांना योजना तयार करण्याच्या कामी सर्व प्रकारचे सहाय्य करावे असे ठरले. सामाजिक वनीकरणासंबंधी सद्यः-स्थिती अशा प्रकारचे एक निवेदन श्री. शरद कुलकर्णी व श्री. दाते यांनी डिसेंबरपर्यंत तयार करावे अशी विनंती करण्यात आली.

सामाजिक वनीकरणाच्या संकल्पनेमध्ये मूलभूत बदल आवश्यक आहेत. प्रत्यक्षात सामाजिक वनीकरणाची व्याख्या वनखात्याने आपल्या अखत्यारीबाहेरील जमि-नीवर झाडे वाढविणे अशी केली आहे. हा खूपच संकुचित दृष्टिकोण आहे. आदिवासी व लाखो गरीब लोक उपजीविकेसाठी जंगलावर अवलंबून आहेत हे मान्य करणाऱ्या व जंगलाचा नाश न करताही त्यांच्या पद्धतीने त्यांना जगणे सुलभ करू शकणाऱ्या सामाजिक वननीतीची आज निकड आहे. अशा प्रकारच्या धोरणाने दोन हेतू साध्य होतील—जंगलावर उपजीविकेसाठी अव-लंबून असणाऱ्यांना उपजीविकेचे पर्यायी मार्ग उपलब्ध झाल्यामुळे जंगलाच्या नाशाला आळा बसेल व लाग-वडीखाली नसलेल्या व जंगलविरहित जमिनीवरील उत्पादन वाढवून ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावले जाईल. सामाजिक वनीकरण मोहीम यशस्वी व्हावयाची असेल तर सरकारचा दृष्टीकोण व कृति मामध्ये मूलभूत बदल आवश्यक आहेत. तसेच समाजव्यवस्थेमध्ये आणि जमिनीच्या उपयोगपद्धतीमध्ये सुधारणा होणे आव-श्यक आहे.

वनीकरणाची मोहीम केवळ वनखात्याबाहेरच नव्हे तर जंगलाबाहेर काढून लोकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. केवळ मोहक कल्पना मांडून आणि लोकभावनांना आवाहन करून जंगलमालाचा उद्योगधंदे व शहरातील बाजारासाठी होणारा वाढता उपयोग कमी होणार नाही. जंगलविकास म्हणजे जंगलाचा व्यापारी उपयोग ही वनखात्याची कल्पना मुळापासूनच बदलली पाहिजे. गरिबांना रोजगार पुरविण्याचा व विकासाच्या नावा-खाली व्यापारी धोरणाचे समर्थन करणाऱ्या वनखा-त्याच्या भूमिकेमुळे वनअधिकारी व लोक यांच्यामध्ये वैमनस्याची भावना वाढीस लागली आहे. जळणासाठी सरपण, घरांसाठी लाकूड व जनावरांसाठी चारा पुरवू शकणाऱ्या छोटया प्रमाणावरील परंतु विखुरलेल्या जंगलाची आज आवश्यकता आहे. जंगले ही प्रामुख्याने सामाजिक मालमत्ता आहे. तसेच गरिबांसाठी उपजीवि-केचे एक साधन आहे या वस्तुस्थितीकडे राष्ट्रीय हिताच्या नावाखाली दुर्लक्ष करता येणार नाही.

## वनविधेयक : संयुक्त कृतिसंबंधी चर्चा

३ मे रोजी रात्रीच्या सभेत वनविधेयकाला देशभर झालेला विरोध लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी, तसेच वनविधेयकासंबंधी लोकजागृती करण्यासाठी करा-वयाच्या कृतीमागील भूमिका ठरविण्यासाठी सविस्तर चर्चा झाली.

चर्चेसाठी उपयुक्त असे तीन मुद्दे मांडण्यात आले :—

१. वनविधेयकाला झालेला विरोध लोकांपर्यंत पोहो-चविण्यासाठी, तसेच लोकजागृतीसाठी तुम्ही आजपर्यंत काय प्रयत्न केलेत ?

२. संयुक्त कृतीच्या कामामध्ये तुम्ही काय करू शकाल ?

३. इतर गटांकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत ?

वनविधेयकाच्या प्रश्नावर आदिवासी जाणीव जागृति केन्द्राने गेले ६ महिने लक्ष केन्द्रित केले असल्याचे सांगून श्री. शरद कुलकर्णी यांनी वनविधेयकासंबंधीच्या केन्द्राच्या प्रयत्नांची माहिती दिली. नियतकालिके व वृत्तपत्रांतून वनविधेयकाची चर्चा करणारे तसेच आदि-वासी, गरीब यांना आपल्या हक्कांपासून वंचित

करणाऱ्या अशा वनविधेयकातील तरतुदी उघड करून दाखविणारे लेख तसेच जंगलबचाव परिषदा व दिल्ली, इंदूर इत्यादी ठिकाणच्या परिषदांमध्ये सहभागी होऊन वनविधेयकासंबंधी लोकजागृती करण्याचे प्रयत्न केंद्राने केले. वनविधेयकासंबंधी लोकजागृतीसाठी आवश्यक असे सर्व साहित्य कार्यकर्त्यांना पुरविण्यास तसेच विविध ठिकणी स्लाइड–शो आयोजित करण्यास केन्द्र तयार आहे.

ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्सच्या वतीने श्री. दर्शनशंकर यांनी ॲकॅडमी निसर्गसंतुलनाच्या दृष्टीने जंगल किती असावे ? जंगलासंबंधी लोकांचे हक्क कोणते ? इत्यादी माहिती जमविल असे सांगितले. आरक्षित, संरक्षित तसेच गावजंगलभाग दर्शविणारा नकाशा तयार करण्यात येईल. जंगलाच्या तांत्रिक / शास्त्रीय बाबींवर तज्ज्ञांमध्ये चर्चा घडवून आणण्याचे प्रयत्न केले जातील. स्लाईड-शोसाठी प्रोजेक्टर सर्व गटांना पुरविण्यात येतील. वनसंवर्धन व वनविकास यासाठी स्थानिक लोकांच्या हक्कांचा योग्य तो विचार करून कर्जत रेंजसाठी व्यवहार्य अशी योजना तयार करण्यात येईल.

जनसेवा मंडळाने (नंदुरबार) विधेयकासंबंधी माहिती देणारी पत्रके प्रसारित केली. तसेच स्लाईड-शो आयोजित केले. आदिवासींना वनासंबंधी आपल्या हक्कांची जाणीव करून देणारा व संभाव्य आक्रमणाची कल्पना देणारा परिणामकारक नाट्यप्रयोग बसविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे श्री. जेम्स मस्कान्हनेस यांनी सांगितले.

वनविधेयकातील तरतुदीसंबंधी लोकांच्या असलेल्या विरोधाची तीव्र जाणीव सरकारला करून देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर एकाच दिवशी सत्याग्रह, सभा, मोर्चे, इ. आयोजित करून आवाज उठवावा अशी सूचना श्री. डोंगरभाऊ बागूल यांनी मांडली.

वनविधेयकासंबंधी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने मुंबई येथे परिषद आयोजित करावी असे सुचविण्यात आले.

तीन टप्प्यांमध्ये लोकजागृती करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन श्री. प्रदीप प्रभू यांनी केले.

(१) भांडवलदारधार्जिण्या विकासधोरणामुळे गरीब जनतेवर बोजा पडतो हे लोकांसमोर स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे.

(२) सामूहिक वनीकरण, उत्पादन वनीकरण इ. सरकारी योजना लोकांसमोर मांडणे आवश्यक तसेच भांडवलदार व गरीब यात सरकारकडून केला जाणारा पक्षपात लोकांसमोर मांडला जावा. वनविकासामध्ये-सुद्धा भांडवली धोरण कसे शिरकाव करीत आहे हे मांडले पाहिजे.


(३) कोणत्या प्रकारचे सामाजिक वनीकरण लोकांना अपेक्षित आहे हे स्पष्ट करणे आवश्यक आहे.

आदिवासी व जंगल यांचे संबंध आर्थिक स्वरूपाचेच नसून मानवी, भावनिक आहेत हे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

लोकांची लढण्याची शक्ती तीव्र करावी लागेल. संघर्ष टाळण्यासाठी नव्हे तर दमन टाळण्यासाठी तात्पुरते पर्यायी मार्ग शोधणे आवश्यक आहे.

## अस्थायी कृतिसमिती स्थापनेविषयी चर्चा

४ मे रोजी सकाळच्या सत्रामध्ये वनविधेयकातील तरतुदींविरुद्ध संपूर्ण महाराष्ट्रभर संयुक्त कृतीचा कार्यक्रम ठरविण्यासाठी अस्थायी कृतिसमितीची स्थापना करण्याचे एकमताने ठरविण्यात आले. कृतिसमितीची भूमिका स्पष्ट करणाऱ्या निवेदनाचा मसुदा तयार करून तो काही फेरबदल करून स्वीकारण्यात आला. (मसुद्यासाठी परिशिष्ट १ पहा) हा मसुदा मान्य असणाऱ्यांनाच कृतिसमितीत सहभागी करून घ्यावे असे ठरले. यासंबंधी पहिली बैठक जूनमध्ये घ्यावी असे सुचविण्यात आले.



परिशिष्ट १

# जंगलबचाव कृतिसमितीच्या 'भूमिकेचा मसुदा

लोकसभेत येणारे आगामी वनविधेयक, सध्या प्रचलित असलेला वनकायदा आणि वनखात्याचा प्रत्यक्ष व्यवहार यामागे एक समान सूत्र आहे आजपर्यंतच्या वनधोरणांमध्ये पाणी व मातीचे संरक्षण व स्थानिक लोकांचे हक्क हे लिखित स्वरूपात व अग्रक्रमाने मान्य केले गेले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र हे हक्क पद्धतशीरपणे अधिकाधिक डावलून व्यापारी आणि औद्योगिक हितसंबंध राखण्यासाठीच वनधोरणे राबविली गेली असे मूठभर लोकांचे हितसंबंध राखण्यासाठीच वनधोरण हे राष्ट्रीय हिताशी निगडित आहे असा आभास निर्माण करण्यात येत आहे. वस्तुत: अशा प्रकारचे वनधोरण स्थानिक जनतेवर अन्यायकारक तर आहेच परंतु त्याचबरोबर वनसंवर्धन व निसर्गसंतुलन यांच्या दृष्टीनेही हानीकारक आहे. (उदा. साग, चिड व निलगिरी इ. वृक्षांची एक प्रजातीय लागवड) असे हे लोकविरोधी वनधोरण आम्हाला मूलत: अमान्य असल्याने आगामी वनविधेयकाला आमचा ठाम विरोध आहे.

आतापर्यंत सरकारच्या वनधोरणातील उक्ती आणि प्रत्यक्ष कृती यामधील विरोधाभास प्रकर्षाने समोर आला नाही. कारण उपलब्ध वनक्षेत्राच्या तुलनेत औद्योगिक गरजा मर्यादित होत्या. परंतु आता झपाट्याने वाढणाऱ्या औद्योगिक गरजा व त्याचबरोबर प्रबळ झालेले औद्योगिक हितसंबंध यांच्या तुलनेत वनक्षेत्र कमी होत असल्याने हा विरोधाभास अधिकाधिक तीव्र व स्पष्ट होत आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये दुर्बळ वनवासी आदिवासीची शिकार होत आहे. हा हल्ला सरळ सरळ आदिवासी जीवनपद्धतीवर असल्याने आदिवासी उध्वस्त होत आहे.

एकीकडे आता अस्तित्वात असलेली नैसर्गिक वनसंपत्ती औद्योगिक आणि काही विशिष्ट लोकांचे हितसंबंध जोपासण्यासाठी राखून ठेवून दुसरीकडे सामान्य जनतेच्या गरजा भागविण्यासाठी सामाजिक वनीकरणाचा देण्यात येत असलेला दिलासा फसवा आहे. नैसर्गिक जंगलांमध्ये स्वावलंबी असलेला वनवासी, आदिवासी या प्रक्रियेमुळे आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठीसुद्धा बाजारात ओढला जात आहे.

स्थानिक जनतेच्या दैनंदिन गरजा व उपजीविका यांची पूर्ती करण्यासाठी स्थानिक जंगलातील वनोत्पादनावरील हक्क मान्य करणे हाचकोणत्याही लोकाभिमुख वननीतिचा गाभा असला पाहिजे. स्थानिक जनतेच्या दैनंदिन गरजा व उपजिविकांची पूर्ती प्रामुख्याने स्थानिक जंगलामधून मिळणाऱ्या गौण वनउपजांच्या उत्पन्नातून झाली पाहिजे. पर्यायाने उपजीविकेसाठी त्यांना जंगल तोडीवर अवलंबून रहावे लागू नये. झाडाच्या अस्तित्वाला कोणत्याही प्रकारे हानीकारक न ठरता मिळू शकणारी वनउत्पादने गौण वनउपज म्हणून समजण्यात यावीत असे आम्हास वाटते.

अपेक्षित लोकाभिमुख वननीतिसाठी कृतीसमिती पुढील बाबींचा आग्रह धरेल.

१. आगामी वनविधेयकाला संपूर्ण विरोध.
२. दळी पद्धतीने मिळालेल्या व अतिक्रमित जमिनी कसणाऱ्या आदिवासी वनवासींना मिळाल्या पाहिजेत.
३. गौण वनउपजांवरील वनवासी आदिवासींचे अबाधित अधिकार मान्य केले गेले पाहिजेत.
४. स्थानिक जनतेच्या हक्कावर मर्यादा न घालता जेथे प्रचंड भांडवली गुंतवणूक आवश्यक आहे अशा भूभागावर वनसंवर्धन व वनविकासाची जबाबदारी उद्योगधंद्यांवर टाकण्यास हरकत नाही.

□

( पृष्ठ क्र. २८ वरून )

**' पेनदा टास आद मान्याना कास '**

अर्थ :– देवाचे फक्त निमित्त असते. घडवणारा आणि खाणारा माणूसच असतो. गोंड हे निसर्गपूजक आहेत. त्यांच्या देवदेवतांच्या पूजांमधून त्यांच्या निष्ठा व्यक्त होतात. तरी त्यांच्यातील माणूसपण निश्चितच जिवंत असावे. देव हे एक कारण, एक निमित्त आहे. बाकी घडवणारा माणूसच. ह्या म्हणीतून दोन अर्थ संभवतात. १) अपत्यांच्या जन्माचा संदर्भ असणारी ही म्हण असू शकते. २) व्यावहारिक जीवनातल्या घटनांचे मूळ सांगणारीसुद्धा ही म्हण असू शकते.

मुलं ही देवाची देणगी असा एक समज आहे. मात्र माणूस ह्याच त्याला कारणीभूत असतो आणि देवहा एक निमित्त. अथवा कोणती चांगली घटना घ्या. (उदा. जास्त पीक होणे) तर माणूस देवावर हवाला देतो. देवाला श्रेय देतो. वास्तविक त्याच्या कष्टातूनच शेत फुलते. माणसातील माणूसपणाच्या सत्याचे सौंदर्य ह्या म्हणीतून अधिक गडद होते.

आणखी एक म्हण ह्याच संदर्भात पाहण्याजोगी आहे.

**' कयदे इंदाना वुंडे कोया खोमने मंदान्त '**

अर्थ :– 'हातांनी बोलावं आणि कोया संस्कृतीत राहावं.' 'हातांनी बोलणे' हा शब्द इथे वेगळा आशय घेऊन येतो. त्याचा अर्थ हातांनी कष्ट करणे अथवा मेहनत करणे असा आहे. 'संस्कृतीत राहावं' म्हणजे आपल्या संस्कृतीशी एकनिष्ठ रहावं किंवा आपली संस्कृती जपावी. गोंडी संस्कृतीच्या नैतिक मूल्यांचं स्पष्टीकरण देणारी ही म्हण आहे. कष्ट हेच त्याचं बोलकेपण आणि संस्कृती जपणे हेच त्याचं जगणं आहे. कष्ट करून जगण्याची इच्छा, त्या इच्छेला संस्कृती जपण्याची दुर्दम जाणीव आणि ह्या जाणिवेतून व्यक्त होत जाणारी त्यांची नितळ नीतिमत्ता ह्या म्हणीतून प्रतीत झाल्यावाचून रहात नाही.

आणखी एक म्हण किनवटकडील गोंडांत प्रसिद्ध आहे.

**' गटा सुडसी पटवा जावा सुडसी तेदवा '**

अर्थ :– काम पाहून झोपू नये अन् अन्न पाहून जागू नये. काम हा शब्द कष्ट, अडचण, संकट ह्या अर्थांनी आला आहे आणि अन्न हा लोभ, द्रव्य ह्या अर्थांनी. माणसानं कितीही अडचणी आल्या म्हणजे झोपायचं नसतं अथवा लोभ पाहून उठायचंही नसतं. हा सुंदर विचार ह्या म्हणीतून प्रकट होताना दिसतो. गोंडांच्या कष्टाळूपणाची आणि प्रामाणिकपणाची ही एक पावतीच आहे हे स्पष्ट व्हावे.

बोथ तालुक्यातल्या गोंडांत एक म्हण प्रसिद्ध आहे.

**' येंदान्लासी मेंदूल येंदान्लासी तेंडूल '**

अर्थ :– 'शरीर हे नाचण्यासाठी असते तर मन हे पेरण्यासाठी.' इथं 'नाचणे' हा शब्द माणसाच्या भौतिक जीवनातील घडणाऱ्या घटनांच्या अर्थाने आला आहे. शरीर आणि मन ह्यांच्यातल्या उपयुक्ततेचं विकेंद्रीकरण ह्या म्हणीतून दिसते. आत्मा, ब्रह्म या अध्यात्मिक तत्त्वज्ञानाशी अनभिज्ञ असलेल्या गोंडांना शरीर आणि मनाचं समीकरण मांडता यावं हे विशेष शरीर भौतिकतेसाठी असते, भौतिक सत्यासाठी असते. तर मन हे विचार पेरण्यासाठी असते, हा सुंदर विचार ह्यातून प्रकट झालेला आहे.

लोकजीवनातील कठोर नैतिक सत्ये सांगतानाच त्याला कलात्मकतेची घातलेली जोड आणि ह्या समीकरणातून मानवी जीवनातल्या मानसिकतेची उत्तरे शोधण्याची धडपड गोंडी म्हणींमधून ओसंडताना दिसते हेच गोंडीमधील म्हणींचे मोठेपण आणि निराळेपण आहे.



## संवाद

मा. संपादक,
'हाकारा'

लोक-जीवनाशी निगडीत असलेल्या समस्यांबाबत 'हाकारा'च्या खास अंकातून अतिशय उपयुक्त माहिती पुरवण्याचा आपला उपक्रम स्तुत्य आहे. ग्रामीण स्तरावर काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांना 'हाकारा' मोलाचे मार्गदर्शन करतो माहितीतील आवश्यक भाग व नेमकेपणा हे सर्वच लेखांचे वैशिष्टय असते आतापर्यंतचे सर्व अंक अतुलनीय निघाले आहेत. आदिवासी संस्कृति, वन-संवर्धन, जंगल-अतिक्रणाचा प्रश्न, दलित व राखीव जागा, आरोग्य, रोजगार हमी अशी विषय-योजना आतापर्यंत झाली. त्यामुळे सामान्य कार्यकर्त्यांचे बळ निश्चितच वाढते.

आता यापुढे सरकारचा 'महसूल विभाग व शेतकरी' या संबंधात तलाठी, सातबारा-उतारा, नियम, शेती-योजना, सवलती इ. बाबत तसेच 'पोलीसखाते व जनता' अशा काही विषयांची योजना करावी असे सुचवावेसे वाटते.

तळातल्या कार्यकर्त्यांचा 'हाकारा' म्हणजे दीपस्तंभ वाटतो.

**मा. तु. खैरकर**
**विक्रमगड**

आपला जानेवारी–मार्च १९८२ 'हाकारा' अंक फारच आवडला. हिमालयातील (उत्तरखंड विभाग) पर्यावरण अभ्यास-पाहणी मोहीम अहवाल अभ्यासपूर्ण तसेच प्रत्यक्ष अनुभव करून अनुभव मिळवल्यामुळे जास्त अनुभवपूर्ण वाटला. या मोहिमेची अगोदरपासूनच माहिती असल्याने प्रथमच तो अहवाल वाचला. मोहिमेतील सर्वच गटांचा अहवाल उत्कृष्ट आहेच; पण विशेषत: गट क्रमांक तीनचा अहवाल विशेष अभ्यासपूर्ण वाटला.

**जयंत जोग**
**खोपोली**

## पर्यावरण रक्षणाचे मॅगसेसे पारितोषिक चंडीप्रसाद भट यांना

हिमालयाच्या गढवाल-कुम-उँ भागातील पहाडी आदिवासी लोकांनी वनसंवर्धनासाठी व एकूण पर्यावरण रक्षणासाठी सुरू केलेल्या 'चिपको' आंदोलनाचे प्रवर्तक चंडीप्रसाद भट यांना पर्यावरण रक्षणासाठी त्यांनी केलेल्या बहुमोल कामगिरीबद्दल यंदाचे रेमन मॅगसेसे पारितोषिक देण्यात आले आहे. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.


जिल्ह्यातील अग्रेसर बँक

**सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, सातारा**

**प्रधान कार्यालय : शिवाजी सर्कल, सातारा.**

**सांपत्तिक स्थिती – ३१–७–८२ अखेर**

| | |
|---|---|
| खेळते भांडवल | रु. ५३ कोटी ७८ लाख |
| ठेवी | रु. ४० कोटी ३१ लाख |
| कर्ज | रु. ३८ कोटी ०५ लाख |

जिल्ह्यातील एकूण ९० शाखांमार्फत शहरी व ग्रामीण जनतेची सेवा करीत आहे.

ठेवीला विमा योजना, ठेवीवर भरघोस व्याज, लोकमंगल, आवर्त ठेव, पेन्शन योजना

व यासारख्या अनेक ठेव योजना, जिव्हाळ्याची व तत्परतेची सेवा, सर्व प्रकारचे बँकिंग व्यवहार.

**मुख्य कार्यालय : (सातारा), राजवाडा शाखा.**

**शाखा : सातारा कराड, फलटण, मायणी, पांचगणी, दहिवडी, ढेबेवाडी, पाटण, आझाद चौक शाखा, कराड, मार्केट यार्ड, कराड, कलेढोण तारळे येथे सेफ डिपॉझिट लॉकरची सोय.**

| | | |
|---|---|---|
| **व्यं. ज्ञा. भोसले** | **स. आ. पोळ** | **वि. बा. पाटील** |
| व्यवस्थापक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

# “ गोबरगॅस ”
# राष्ट्रीय ऊर्जासमस्येवर एक उपाय

**शिवाजीराव मा. जामदार.**

भारत हा शेतीप्रधान देश असून अन्नाचा तुटवडा हा भारतापुढील सर्वात मोठा प्रश्न आहे. त्याच्या खालोखाल कमी होणारी जंगले, इकडे कानाडोळा करून चालणार नाही. या सर्वांचा परिणाम म्हणजे खेड्यांतील गरिबांना जाणवणारी जळणाची अडचण.

आपल्या देशात शेती बहुतांशी जनावरांच्यासाहृयानेच नांगरली जाते. जगातील कोणत्याही देशापेक्षा आपल्या देशात पशुधन फार मोठे म्हणजे जवळजवळ २४ कोटींच्या आसपास आहे.

या पशुधनापासून मिळणाऱ्या शेणाच्या १।३ शेण जळणाखातर गोवऱ्या बनविण्यास वापरले जाते. त्याचा विनियोग जर खताकडे करण्यात आला तर देशांत १ कोटी टन धान्याची जादा पैदास होईल आणि आज देशाला जो अन्नाचा प्रश्न भेडसावीत आहे तो बराचसा कमी होईल.

शेणाप्रमाणेच भारतात दरसाल अनेक कोटी टन सरपण जंगलतोड करून वापरले जाते. त्याचा परिणाम देशातील वृक्षसंपत्ती दरसाल कमी कमी होत चालली आहे. वृक्ष-वनस्पतीच्या संरक्षणाच्या अभावी जमिनीची धूप मोठ्या प्रमाणात होत असून पर्जन्यमानाचे प्रमाण दिवसेंदिवस फारच घटत चालले आहे.

आणि हृया सर्व गोष्टींचा परिणाम अन्नधान्याच्या आणि जंगलवाढीच्या बाबतीत सारखी घट मात्र होत चालली आहे. यासाठी एक परिणामकारक उपाय म्हणजे गोबरगॅस यंत्र ! कुजणाऱ्या पदार्थांचा शास्त्रीय दृष्टिकोन ठेवून पद्धतशीर वापर गोबरगॅसप्लँट या यंत्रात करून घेतला आहे.

गोबरगॅस यंत्रातून शेण हे ४३ % अधिक खत व २० % अधिक इंधन देऊ शकते. खत तयार करण्याच्या प्रक्रियेतच सह–उत्पादन म्हणून या गॅसची निर्मिती होत असल्यामुळे हा गॅस जवळजवळ मोफतच मिळतो.

गोबरगॅसबाबत मुद्दाम सांगितले पाहिजे की, तयार होणारा गॅस हा ‘ मिथेन गॅस ’ असतो. यामध्ये मिथून ५५% कार्बन ४०% आणि पाणी ५टक्के असते. हा गॅस कॉंप्रेस होत नसल्याने जागेवरच वापरणे आर्थिकदृष्टया फायदेशीर होते या गॅसचा स्फोट मुळीच होत नाही. शिवाय दुर्गंधी, डास, माशा इतर किडे वगैरेंचा त्रास या गॅसच्या निघणाऱ्या खतावर होत नाही, म्हणून हे गॅसयंत्र आपल्या शहरात, गावात, वस्तीत अगदी घराशेजारी करावयास हरकत नाही.

फक्त प्लँटमधून निघणाऱ्या पातळ खतरूपी शेणासाठी अगदी जवळ कंपोस्टखताचा खड्डा वा खड्डे असणे जरूरीचे असते. गॅसयंत्रातून निघणाऱ्या खताच्या राडीत असलेल्या सूक्ष्म जंतूंमुळे व त्यातील पोषक अंगामुळे कंपोस्टखत कुजण्याची क्रिया त्वरित होते. पिकास पाण्याबरोबर जर प्लँटमधून निघणारे पातळ शेण सोडले तर ते पिकाला चांगलेच मानवते.

गोबरगॅसप्लँटचे खत वापरून कित्येक शेतकऱ्यांनी आपले शेतीउत्पादन २५ ते ३० टक्क्यांनी वाढविले आहे. गोबरगॅसप्लँटपासून मिळणारे खत साध्या शेणखतापेक्षा किती तरी प्रभावी असते.जेवढ्या शेणापासून आपणांस ७ गाड्या शेणखत मिळते तेवढ्याच शेणापासून आपणास गोबरगॅसप्लँटमुळे १० गाड्या खत मिळू शकते. शेणखतात ३।४ टक्के नायट्रोजन असतो तर गोबरगॅसप्लँटच्या खतात जवळ जवळ २ टक्के नायट्रोजन असतो.

शेणखतात जेवढा उद्‌भिज्य हृयूमस असतो त्याच्या जवळजवळ दुप्पट गोबरगॅसप्लँटच्या खतात असतो. गॅसप्लँटचे खत शेणखतापेक्षा मातीत जास्त लवकर मिसळू शकते. पाणी पकडून ठेवण्याच्या मातीच्या स्वभावधर्मास या खतामुळे अधिकाधिक बळकटी येते. तसेच जमिनीत पिकांची जी पोषक द्रव्ये असतात ती जोराच्या पावसात वाहून जाण्यास हे खत प्रतिबंध करते.

गॅसप्लँटच्या खतामध्ये उद्‌भिज्य हृयुमस अधिक असल्याने जमीन खुली व हवामय बनते. त्यामुळे जमिनीचे बाष्पीकरण न होता तिची आर्द्रता टिकून रहाते. त्यामुळे नांगरट आणि अंतरमशागत कमी करावी लागते. उद्‌भिज्य हृयुमसयुक्त अशा सेंद्रीय खताच्या वापरामुळे जमिनीची उत्पादनक्षमता पुष्कळ वाढते.

शेणखतात शेतात बरेच गवत उगवते आणि ते काढुन टाकण्यासाठी खर्च करावा लागतो; परंतु गॅसप्लँटच्या खतामुळे तसे होत नसल्याने गवत वा तण काढण्याचा खर्च वाचतो.

शहरांत, खेड्यांत अगर लोकवस्तीच्या ठिकाणी जनावरे पाळणारे लोक असतात. त्यांनी तर गोबर—मैलागॅसप्लँट आवश्यक बसवावा. कारण त्यामुळे स्वयंपाकासाठी गॅस तर मिळतोच; शिवाय उजेडासाठी लाइट पण मिळतो आणि संडासाचापण प्रश्न मिटतो.

लोकवस्तीतील धूसर, कोंदट हवा, त्यामुळे होणाऱ्या प्रदूषणावर हा चांगला उपाय आहे. स्वयंपाकघरात धूर वा इतर दुर्गंधीचा प्रश्न येत नाही. त्यामुळे तेथील आरोग्य व्यवस्थित रहाते.

गॅसप्लँट बांधण्यासाठी खादी ग्रामोद्योग आयोगाकडून तांत्रिक मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य मिळते व अनुदानरूपाने खर्चाच्या २०% रक्कम रोख मिळते. महाराष्ट्रातील सर्व राष्ट्रीयीकृत बँका सर्व प्रकारच्या गॅसप्लँटसाठी कर्जरूपाने अर्थसहाय्य करतात. स्वतःच्या खर्चाने जरी गॅस प्लँट बांधला तरी खादी ग्रामोद्योगामार्फत त्यास २० टक्के अनुदान (सबसिडी) रोख मिळते. गोबरगॅस, बद्दल माहिती व मार्गदर्शन हवे असल्यास त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**कृषि विकास प्रतिष्ठान, बारामती.**

---

# वनौषधी

## लोकविज्ञान शिबिर, कशेळे

---

कर्जत तालुक्यातील कशेळे येथील अॅकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स ' येथे हे शिबिर झाले.

१४ ते १६ मे असे अडीचदिवस चाललेल्या या शिबिराला उपस्थित असलेल्या ३५ व्यक्ती ज्ञानविज्ञानाच्या विविध क्षेत्रातील होत्या—वनस्पतीशास्त्र, जीवरसायन शास्त्र, आयुर्वेद, मानवशास्त्र, अॅलोपथी, पारंपारिक वनौषधीउपचारपद्धती, वनौषधीसंवर्धन इ.

शिबिराची पार्श्वभूमी व भूमिका स्पष्ट करताना श्री. शरद कुलकर्णी म्हणाले वनौषधी व स्थानीय उपचारपद्धतींची समाजाच्या आरोग्यरक्षणासंबंधीची उपयुक्तता जोखून पाहणाऱ्या व्यक्ति व संस्था यांना समान व्यासपीठावर आणण्याचा हेतू या शिबिरामागे आहे. त्या निमित्ताने हे लोक एकत्र जमतील, चर्चा करतील. यातून काय निष्पन्न होईल हे आताच सांगणे कठीण आहे परंतु सदर विषय लोकविज्ञानाशी तसेच समाजाची मूलभूत गरज—आरोग्याशी निगडीत असल्याने ही चर्चा नक्कीच उपयुक्त ठरेल.

शिबिरात खालील विषयांवर चर्चा झाली त्यापैकी पहिले तीन सर्वसाधारण स्वरूपाचे तर उरलेले तांत्रिक स्वरूपाचे होते.

१. पारंपारिक वैद्यांचे स्थानिक अनुभव.

२. वनौषधींची स्थानिक क्षेत्रातील उपलब्धता.

३. पारंपारिक लोकौषधींचे आयुर्वेदाशी साधर्म्य.

४. वनौषधी व लोकौषधींची (उपयुक्तता) सयुक्तिकता कशी पारखावी ?

५. वनौषधी गोळा करणे व संरक्षण संवर्धन.

६. पारंपारिक उपचारपद्धतीत संस्थात्मक पाठबळाची निकड.

७. वनौषधींचे अल्पखर्ची उत्पादन.

८. वनस्पतींची वनस्पतीशास्त्रदृष्ट्या पारखपृथक्करण.

१५ मे रोजी सकाळच्या सत्रात—छोट्या वनक्षेत्रातील वनौषधींची उपलब्धता—यावर चर्चा झाली.

१५ मे दुपारच्या सत्रात—वनौषधी उपचारपद्धती व आयुर्वेद यातील साधर्म्य—यासंबंधी चर्चा झाली.

प्रा. रा. के. मुटाटकर यांनी असे प्रतिपादन केले की, आयुर्वेद ही महत्परंपरा (Great tradition) आहे असे म्हणता येईल. उपचारपद्धती 'लघुपरंपरा' (Little tradition) आहे असे म्हणता येईल. दोन्हीही एकाच प्रवाहाचे दोन भाग आहेत. शेकडो वर्षांपूर्वी या दोन परंपरामध्ये मोठ्या प्रमाणावर देवाणघेवाण होत असे परंतु कालौघामध्ये आपल्या सांस्कृतिक आणि बौद्धिक परंपरापासून समाज दूर जात असल्याने तसेच आधुनिक पाश्चिमात्य विज्ञानाच्या प्रभावामुळे ही देवाण घेवाण कमी झाली आहे.

कर्जत तालुक्यातील आदिवासींमध्ये प्रचलित असलेली वनौषधी उपचारपद्धती आणि आयुर्वेद यामधील साधर्म्य शोधण्याचा प्रयत्न डॉ. काळे व श्री. पालेकर यांनी केला असता खालील गोष्टी दिसून आल्या.

१. स्थानिक वैदू वापरीत असलेल्या वनौषधी आयुर्वेदामध्येही वापरल्या जातात.

२. काही विशिष्ट वनौषधींचे स्थानिक उपयोग व आयुर्वेदातील उपयोग यांची तुलना केली असता ४५ वनौषधींच्या संदर्भात खूपच साम्य दिसून आले.

३. वनौषधी गोळा करताना स्थानिक वैदू आयुर्वेदामध्ये करण्यात आलेल्या ऋतू, दिवस, दिवसाच्या वेळा, पौर्णिमा, अमावास्या ग्रहण इ. संबंधातील सूचना व पथ्येच पाळतात.

४. औषधे तयार करण्यासाठी वैदू वापरीत असलेल्या पाच प्रमुख पद्धती आयुर्वेदात वापरण्यात येणाऱ्याच आहेत उदा. स्वरस, कल्क, फंद, काढा व चूर्ण.

या सर्व निरिक्षणांवरून डॉ. काळे व श्री. पालेकर यांच्या मते आयुर्वेद व स्थानिक वनौषधी उपचारपद्धती यामध्येच मोठ्या प्रमाणावर साम्य असून वनौषधी उपचारपद्धती ही पूर्णपणे स्थानिक नाही.

१५ मे रात्री डॉ. वर्तक यांनी वनौषधी, महाराष्ट्रातील खाता येण्यासारखी प्रमुख जंगली कंदमुळे या वरील स्लाईडस दाखविल्या.

१६ मे सकाळी श्री. मावरे यांनी वनौषधी गोळा करणे व त्यांचे संरक्षण–संवर्धन यासंबंधी सोदाहरण विवेचन केले.

डॉ. गुजर यांनी अल्प किंमतीत औषधे तयार करण्याविषयी माहिती दिली. त्यांच्या मतानुसार गटपातळीवर अल्प किंमतीत औषधे तयार करणे सहज शक्य आहे. गटपातळीवर औषधासाठी लागणारा कच्चा माल स्वस्त किंमतीत मिळू शकतो. तसेच तो औषधालयामध्ये पोहचविण्यास तसेच तयार औषधे प्रत्यक्ष ग्राहकांपर्यंत पोहचविण्यास वाहतूकखर्च फारसा येत नाही. स्वस्त आणि परिणामकारक चूर्ण बनविण्याचा सल्ला त्यांनी दिला.

डॉ. गुजर यांनी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला, तो हा की, स्थानिक औषधालयांनी औषधे तयार करताना त्या भागातील प्रमुख रोगांची माहिती मिळवावी व त्यावरील औषधे तयार करावी म्हणजे विक्रीची समस्या उपस्थित होणार नाही.

डॉ. ध्रुव मंकड यांनी वनौषधींची सत्यासत्यता पडताळून पहाण्याविषयी महत्त्वाची चर्चा घडवून आणली. डॉ. मंकड म्हणाले–वनौषधींची उपयुक्तता व सत्यासत्यता पडताळून पाहण्याचे प्रयोग विविध संशोधन-संस्थांमध्ये चालतात; परंतु त्यांच्यामध्ये देवाणघेवाण, सुसंवाद, समन्वय नाही. एखादा प्रमुख क्रियाशील घटक वेगळा करून व्यावसायिक दृष्टीने औषधे तयार करण्याचाच प्रयत्न बऱ्याचदा या अभ्यासामागे असतो. या अभ्यासाचा–संशोधनाचा उद्देश सामान्य जनांच्या ज्ञानामध्ये अधिक भर घालण्याचा असून पूर्णत: व्यावसायिक असतो. परंपरागत शास्त्रामध्ये काहीही सुधारणा न करता वर्षानुवर्षांच्या जुन्या पुस्तकांना चिकटून राहण्याच्या आयुर्वेदिक वैद्यांच्या प्रवृत्तीवर त्यांनी टीका केली.

वास्तविक पाहता आयुर्वेदशास्त्र मानवी शरीरातील चलनवलनाच्या सर्वस्वी भिन्न अशा संकल्पनांवर आधारलेले असूनदेखील अ‍ॅलोपथीच्या निकषावरच आयुर्वेदिक औषधांचीही परीक्षा केली जाते याविषयी श्री. विजय वघ्यार यांनी आश्चर्य व्यक्त केले.

स्थानिक उपचारपद्धतीला संस्थात्मक पाठबळ पुरविण्याची निकड हा शिबिरातील चर्चेचा शेवटचा मुद्दा होता.

श्रीमती नॅन्सी गायकवाड यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, परंपरागत उपचारपद्धती शतकानुशतके स्वतंत्रपणे प्रचलित आहे ही वस्तुस्थिती विचारात घेता ही उपचारपद्धती टिकून राहावी यासाठी कोणत्या प्रकारचे संघटित प्रयत्न–पाठबळ उभे करावे लागेल? लोकौषधींसंबंधीच्या सामाजिक परंपरेची तीन वैशिष्ट्ये त्यांनी निदर्शनास आणली.

१. ही परंपरा स्वयंभूरीतीने विकसित झालेली आहे (गुरु–शिष्य पाठबळाची परंपरा) आणि त्यासाठी कोणत्याही प्रकारच्या शासकीय अगर अन्य (सहाय्याची) जरूर भासलेली नाही.

२. या परंपरेमागचा दृष्टिकोण पूर्णपणे अव्यावसायिक आहे. (सेवेसाठी ज्ञान, फायद्यासाठी नव्हे हे मूल्य त्यामागे आहे).

३. या ज्ञानाचे सामाजिकरण व विकेंद्रीकरण झालेले आहे.

ही परंपरा टिकविण्यासाठी कोणतीही योजना करताना या सामाजिक परंपरेच्या वरील वैशिष्ट्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तसेच स्थानिक वैदूंना एखाद्या सामाजिक आरोग्ययोजनेचे नोकर बनविणे हे या मौलिक स्थानिक परंपरेच्या दृष्टीने आत्मघाताचे ठरेल असा इशाराही श्रीमती गायकवाड यांनी दिला.

प्रा. मटाटकरांच्या मते शहरातील डॉक्टर्स खेड्यात येऊन गोरगरिबांची (लोकांची) सेवा करणे कठीण आहे. वैद्यकीय व्यवसायामधील हितसंबंधी स्थानिक वैदूंसाठी अल्प मुदतीचा डिप्लोमा कोर्स सुरू करण्यास मान्यता देणार नाहीत. सरकारची ग्रामीण आरोग्यरक्षक योजना परिरामकारक ठरलेली नाही. यावर एकच तोडगा निघू शकेल तो हा की, वैदूंनाच पारंपारिक वनौषधींसंबंधी प्रशिक्षण द्यावे. तसेच शास्त्रीय ज्ञानही त्यांना द्यावे. आयुर्वेद आणि वनौषधी उपचारपद्धती यामध्ये अधिक देवाणघेवाण होण्याची निकड आहे. हे साध्य करायचे असेल तर स्थानिक परंपरेला संस्थात्मक पाठबळ देण्याची निकड आहे. □

'हाकारा' पहिला, जानेवारी १९८० : जबरन जोत जंगल जमीन खास विभाग

'हाकारा' दुसरा, एप्रिल १९८० : 'आदिवासी व शिक्षण' खास विभाग

'हाकारा' तिसरा, जुलै १९८० : 'आदिवासी व वन-संवर्धन' खास विभाग

'हाकारा' चौथा, ऑक्टोबर १९८० : 'आदिवासी साहित्य व कला' खास विभाग

'हाकारा' सहावा, एप्रिल १९८१ : 'आदिवासी आणि आरोग्य' खास विभाग

१) डॉ. अल्बर्ट स्वाइट्झर —रंगनाथ गोडबोले
२) मलेरियाची गोष्ट —अरविंद पटवर्धन
३) आदिवासी आणि अनुवांशिकता —एस. एल. काटे
४) ग्राम आरोग्य प्रकल्प—कोसबाड —अनुताई वाघ
५) आदिवासींची श्रद्धास्थाने —वि. म. गोगटे
६) ह्यो दवाखाना आमासाठी हाये —के. आर तोरसकर
७) आदिवासी आणि आधुनिक वैद्यक —अनंत फडके
८) औषधी परिचय — मेहता ट्रस्टचे बहुमोल कार्य औषधी पेटी, होमिओपथी इत्यादि माहितीपूर्ण मजकूर.

'हाकारा' सातवा, जुलै १९८१ : 'वनशेती व वनसंवर्धन' खास विभाग

१) धनगराला धत्तुरा, शहरवाल्यांना मलिदा — जगदीश गोडबोले
२) जंगले वाचवा : धोरण आणि वस्तुस्थिती — दीनानाथ मनोहर
३) वन आणि आदिवासी अर्थव्यवस्था — ब्रह्मदेव शर्मा
४) निलगिरीची वनशेती — आनंद मसलेकर
५) वनसंवर्धन आणि ग्रामीण विकास — इत्यादि माहितीपूर्ण मजकूर

'हाकारा' आठवा, आक्टोबर १९८१ : 'रोजगार हमी योजना' विशेषांक

१) रोजगार हमी योजने-अंतर्गत वनीकरण काही विचार —डॉ. अरविंद रेड्डी
२) रोजगार हमी योजना —डॉ. मधुसूदन साठे
३) हमी योजनेवरील मजुरांचे अनुभव —भिमसिंग गिरासे
४) हमी योजनेचा आढावा व शिफारसी —निकीभाऊ कार्डोझो

हमी योजनेसंबंधी महाराष्ट्राचा अधिनियम तसेच हमी योजनेसंबंधीच्या सरकारी आदेशातील महत्त्वाचा भाग.

'हाकारा' नववा, जानेवारी १९८२ : 'उत्तरखंड अभ्यास मोहीम' विशेषांक

१) अमेरिकेतील रेड इंडियन्स —अरुण लिमये
२) वनव्यवस्थापनाची पारंपारिक पद्धत बदल आवश्यक आहे काय ? —दु. अ. मरबल्ली
३) हिमालयातील पर्यावरणाचा अभ्यास—पहाणी मोहीम
४) चंद्रपूर जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण जमात —सुलभा ओगले
५) कविता —किशोर देशपांडे, —भारत सातपुते —आनंदा बनकर

Registered with the Registrar of Newspapers for India Under No. 35835/80

# हाकारा...

(१) आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

(२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

(३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडविणे

(४) मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे

(५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या सर्व उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. या कार्यात आपणही सहभागी होऊ शकता. मानव विज्ञान परिषदेचे सदस्य आणि हाकाराचे वर्गणीदार होऊन! मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व—

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| सभासद | २० रुपये वार्षिक |
| आणि | |
| हाकाराची वार्षिक वर्गणी | १५ रुपये |
| हाकारा व परिषद यांची संयुक्त वार्षिक वर्गणी | २० रुपये फक्त |

आपली सदस्यत्व फी आणि वार्षिक वर्गणी कृपया

नवीन पत्ता—

**महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषद**
द्वारा, जगदीश गोडबोले,
'सीमा', ब-७, शिरोळे मार्ग, पुणे ४११ ००४.

या पत्त्यावर शक्य तेवढ्या लवकर पाठवा.

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.